
# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता

ऑगस्ट २०२५

ई - मासिक




विशेषांक

# विद्यावार्ता

ई - मासिक





**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**मार्गदर्शक**

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in


# अनुक्रमणिका


- विद्यापीठात स्वातंत्र्य दिनानिमित्त कुलगुरुंचे हस्ते ध्वजारोहण संपन्न १
- विद्यापीठात १ हजार १११ रोपट्यांचे वृक्षारोपण ४
- विद्यापीठात अभ्यासक्रम आकलन विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन ६
- विद्यापीठात एन.ई.पी.-२०२० उपलब्धी, आव्हाने व भविष्यवेध विषयावर कार्यशाळा संपन्न ८
- विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता प्रशिक्षण शिबीर संपन्न १०
- विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागातील योगशास्त्राच्या योगपटूची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड ११
- विद्यापीठात मानवी मनाचा चित्रीय शोध विषयावर कार्यशाळा संपन्न १२
- विद्यापीठात एकात्म मानवदर्शन कार्यशाळा संपन्न १३
- प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला संपन्न १७
- विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती व्याख्यानमाला संपन्न १९
- विद्यापीठात महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समानता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न २१
- विद्यापीठात श्री चक्रधर स्वामी व लीळाचरित्र विषयावर व्याख्यान संपन्न २२
- विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त क्रीडा स्पर्धा संपन्न २४
- विद्यापीठात डी-स्पेस वापरून डिजीटल लायब्ररी तयार करणे विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्‌घाटन संपन्न २६
- विद्यापीठात अँटीरॅगिंग सप्ताहाचा शुभारंभ २८
- विद्यापीठात डॉ. रंगनाथन जयंती निमित्त अभिमुखता सोहळा संपन्न २९
- ॲम्बिशन ॲन्ड ॲक्शन इंडियाज नेट झिरो कार्बन स्टेटेजी विषयावर चर्चासत्राचे उद्‌घाटन संपन्न ३०
- विद्यापीठातील आंबेडकर अभ्यास केंद्राची व्याख्यानमाला संपन्न ३२
- विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप ३३
- जयंती विशेष ३५
- बातमी कात्रणे ३७




# शैक्षणिक विकासामध्ये सर्वांचे योगदान महत्वाचे - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण



ध्वजारोहण समारंभात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

शैक्षणिक विकासामध्ये सर्वांचे योगदान महत्वाचे असल्याचे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत आदी उपस्थित होते.

ध्वजारोहणप्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, १५ ऑगस्ट, १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्य मिळून आज ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. हा दिवस आपल्याला आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाची आठवण करुन देतो. अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सर्वस्व अर्पण करुन प्रसंगी बलिदान सुद्धा दिले आहे.

स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय मुक्ती नाही, तर सामाजिक आणि आर्थिक समानता देखील आहे. गेल्या ७८ वर्षात आपल्या देशाने अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केली असून विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी आणि शिक्षणामध्ये आपण मैलाचे दगड गाठले आहे. उच्च शिक्षण घेणाया विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे आणि असमानता हे सुद्धा एक आव्हान आहे. आपल्या संविधानाने आपल्याला समानता, न्याय व बंधुत्वाची शिकवण दिली असून या मूल्यांचे पालन करणे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे.

नवीन शैक्षणिक धोरण लागू झालेले आहे. या धोरणाची परिपूर्ण अंमलबजावणी करण्याचे इंद्रधनुष्य आपण हाती घेतले आहे. शिक्षकांनी सुद्धा स्वत: जबाबदारी घेवून विविध कौशल्ये आपल्या विद्यार्थ्यांना कसे देता येईल, आपला विद्यार्थी कसा परिपूर्ण होईल, तो व्यावसायिक, उद्योजक कसा बनेल, रोजगाराची नवी दालने, संधी त्याला कशी उपलब्ध होईल, यावर शिक्षकांनी काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील शिक्षक व कर्मचायांची पदभरती सुद्धा लवकरच केली जाणार असल्याची घोषणा मंत्री महोदयांनी यापूर्वी केली आहे. आपल्या विद्यापीठाला सुद्धा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचायांची पदे मिळतील, अशी आम्हाला आशा आहे.

आपल्या विद्यापीठातील उपयोजित परमाणू विभागामध्ये एम.टेक. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स डेटा सायन्स, संगणकशास्त्र विभागामध्ये बी.एस्सी. डेटा सायन्स ॲन्ड ॲनॅलिटीक्स आणि एम.बी.ए. विभागात बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) हे अभ्यासक्रम आपण सुरु केले आहेत. आज आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे युग आहे, तसेच सेवा क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशाप्रसंगी सेवा क्षेत्र आपल्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी खुणावत आहे. विद्यार्थ्यांना अशाप्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणे हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे. हे अभ्यासक्रम माझ्या पुढाकाराने विद्यापीठात सुरु होत असल्याचा मला अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.



ध्वजारोहण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

नॅक द्वारे भारतातील विद्यापीठांचे मूल्यांकन केले जाते आणि तेथील कामगिरी बघून त्यांना गुणांकन दिल्या जाते. याशिवाय जागतिक पातळीवर सुद्धा विद्यापीठांना रँकींग दिल्या जाते. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठातील शैक्षणिक विभाग सक्षम व्हावेत, सर्व पातळ्यांवर त्यांचे कार्य उंचावे, याकरीता महाराष्ट्र शासनाने युनिव्हर्सिटी डिपार्टमेन्ट रँकींग फ्रेमवर्क मध्ये सहभाग घेण्याकरीता शासन निर्णयाद्वारे मूल्यांकनाचे प्रमुख निकष ठरवून दिले आहेत. युनिव्हर्सिटी डिपार्टमेन्ट रँकींग फ्रेमवर्क आता लागू झाले असल्यामुळे दरवर्षी ३० जूनपर्यंत विभागाची उपलब्धी, क्रेडेन्शिअल आणि कामगिरीची माहिती सादर करणे शासनाकडून बंधनकारक करण्यात आले आहे. या अंतर्गत संशोधन पेपर्स, पेटेन्ट्स, मंजूरी पत्रे, निधी वितरण, उपयोगिता प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक ऑडिट अहवाल प्रत्येक शैक्षणिक विभागाला सादर करावा लागणार आहे. या फ्रेमवर्कमध्ये विविध श्रेणीनुसार शैक्षणिक विभागाचे मूल्यांकन होणार आहे. या नवीन फ्रेमवर्कमुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये गुणवत्ता आणि संशोधनाला निश्चितच चालना मिळणार असून त्यामध्ये दिलेल्या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी शैक्षणिक विभागप्रमुख व शिक्षकांनी संपूर्ण प्रयत्न करावयाचे आहेत. आमच्या शिक्षकांनी त्यादृष्टीने घेतलेला पुढाकार शंभर टक्के यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग, अध्यासन व प्रशासकीय विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी, यादृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीपणे करण्यात आले, त्या सर्वांचेच कुलगुरूंनी यावेळी कौतुक केले. निसर्गरम्य विद्यापीठ परिसरात बऱ्याच सुविधा आपण केलेल्या आहेत. एका बहुउद्देशीय सभागृहाची आवश्यकता होती. १३ कोटी रूपये खर्चाच्या बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम सुरु झाले असून ४.५ कोटी रुपयांचे क्लासरुम कॉम्प्लेक्स, तर ४.५ कोटी रुपयांच्या मुलींचे वसतिगृहाचे बांधकाम सुद्धा सुरु झाले आहे. याशिवाय बुलढाणा येथे असलेल्या आदर्श महाविद्यालयाच्या इमारतीचे १४ कोटी रुपयांचे बांधकाम लवकरच सुरु होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलीदान देणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करुन कुलगुरूंनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





ध्वजारोहण समारंभाला उपस्थित विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी



नृत्य सादर करतांना विद्यार्थीनी



पथनाट्य सादर करतांना विद्यार्थीनी



सामुहिक छायाचित्र



# विद्यापीठात १ हजार १११ रोपट्यांचे वृक्षारोपण

## सर्वांनी प्रेरणा घेवून विद्यापीठाचा कॅम्पस आणखी हिरवागार करावा-कुलगुरू



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते वृक्षारोपण करतांना

शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणातून प्रेरणा घेवून आपला विद्यापीठाचा कॅम्पस आणखी हिरवागार करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र अभियानांतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील जलाशय साठा क्र. २ परिसरात बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी १ हजार १११ रोपट्यांच्या वृक्षारोपणाचा शुभारंभ अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल व कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आला. यावेळी विद्यापीठ परिसर, वृक्षांची, जैविक संपदा आदींची कुलसचिव यांनी माहिती दिली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी रोपटे देवून विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, विद्यापीठाच्या परिसराची ऑक्सिजन पार्क म्हणून ओळख आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसरात दररोज सकाळ, सायंकाळी मॉर्निंग वॉककरिता नागरिक येतात. १११ किलो बियाण्यांचे बिजारोपण सुध्दा यावेळी करण्यात आले,



विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल वृक्षारोपण करतांना

त्यामुळे आणखी वृक्ष परिसरात तयार होणार आहेत. पर्यावरणपुरक, विविध वृक्षवेलींनी नटलेल्या परिसरासाठी उद्यान विभागाचे अधीक्षक श्री अनिल घोम, त्यांची चमू, तसेच कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे व त्यांची चमू यांनी अथक परिश्रम घेतले असून, त्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, व्य.प. सदस्य डॉ. मनिषा कोडापे, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, न.न.सा. संचालक डॉ. अजय लाड, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, केमटेकचे डॉ. प्रशांत शिंग्वेकर, वनस्पतीशास्त्राचे डॉ. प्रशांत गावंडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, उपअभियंता श्री राजेश एडले, दै. हिंदुस्थानचे संपादक श्री उल्हास मराठे, अभियांत्रिकी व उद्यान विभागाचे कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



वृक्षारोपण प्रसंगी उपस्थिती

# एन.ई.पी. अभ्यासक्रमाच्या सर्वसमावेशक अंमलबजावणीकरिता शिक्षकांनी योगदान द्यावे – कुलगुरू

## विद्यापीठात 'अभ्यासक्रम आकलन' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन




अध्यक्षीय विचार मांडतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

भारतामध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाले असून विद्यापीठाने सुद्धा त्याची अंमलबजावणी केली आहे. एन.ई.पी. धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याकरीता शिक्षकांचे योगदान व भूमिका महत्वाची असून ते आपले परिपूर्ण योगदान देतील आणि विद्यार्थ्याला सर्वसमावेशक बहुविद्याशाखीय शिक्षण मिळेल, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यास मंडळाच्यावतीने विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती सभागृहात 'अभ्यासक्रम आकलन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उद्घाटक म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.आर.डी. सिकची, विशेष अतिथी म्हणून विद्या परिषदेच्या सदस्य डॉ. वर्षा सुखदेवे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. दिनेश निचित, लेखा व सांख्यिकी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. जयंतकुमार गुप्ता, व्यवसाय अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष डॉ. अरुणा वाडेकर, वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संग्राम रघुवंशी व व्यवसाय व्यवस्थापन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. महेश गायकवाड उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते पुढे म्हणाले, एन.ई.पी. लागू होवून पाच वर्षे पूर्ण झाली आहे. सर्वसमावेशक व बहुविद्याशाखीय शिक्षण हे एन.ई.पी. चे उद्दिष्ट आहे. ब्रिटीशांनी त्या काळात लागू केलेल्या शिक्षण पद्धतीमुळे आमचे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास व ज्ञानार्जन तसेच विविधांगी कौशल्यापासून दूर राहीले. नोकरी करण्यापूरतेच शिक्षण एवढाच शिक्षणाचा उद्देश राहीला. त्यामुळे प्राचीन काळापासून आमचे विद्यार्थी ज्या प्रकारचे शिक्षण घेत होते, त्या शिक्षणाची उद्दिष्ट्ये एन.ई.पी. मध्ये आहेत. झालेले नवीन बदल समजून घेवून अमंलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींवर आपल्याला मात करायची आहे. शिक्षकांच्या शंका–कुशंका निश्चितच दूर झालेल्या आहेत, कारण एन.ई.पी. ची पहिली तुकडी बाहेर पडली आहे. एन.ई.पी. ची सर्वसमावेशक अंमलबजावणी आणि अडचणी दूर होण्याच्या दृष्टीने शिक्षकांना बहुमूल्य योगदान द्यायचे आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चांगल्या सक्षम पिढ्या भविष्यात घडतील, असेही ते म्हणाले.

उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ.आर.डी. सिकची यांनी केली. ते पुढे म्हणाले, एन.ई.पी. काळाची गरज असून परिपूर्ण अंमलबजावणीकरीता व विद्यार्थ्यांना याची माहिती व्हावी, याकरीता तयार झालेल्या अभ्यासक्रमाचे आकलन होण्याच्या दृष्टीने आयोजित कार्यशाळा निश्चितच मैलाचा दगड ठरेल. यापुढे वाणिज्य शाखेला निश्चितच अच्छे दिन येतील, असेही ते याप्रसंगी म्हणाले.




कार्यक्रमाचे उद्घाटक व व्य.प.सदस्य डॉ. आर.डी. सिकची विचार व्यक्त करतांना

डॉ. वर्षा सुखदेवे म्हणाल्या, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा सक्षम होण्याच्या दृष्टीने कार्यकाळेचे अयोजन महत्वाचे आहे. मौलिक व सर्वसमावेशक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात असल्यामुळे कार्यशाळेत त्यादृष्टीने चांगला संवाद होईल. यावेळी त्यांनी एन.ई.पी. मधील विविध बाबींवर प्रकाश टाकला. विकसित भारत एन.ई.पी. चे उद्दिष्ट असून आपल्या विद्याशाखेच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होईल आणि त्यातून आपल्या देशाचा विकास होईल, असेही त्या म्हणाल्या.

सुरुवातीला विद्यापीठ गीत, कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व शाल, श्रीफळ, रोपटं देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अधिष्ठाता डॉ. दिनेश निचित यांनी प्रास्ताविक भाषणातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विशद केली. एन.ई.पी. नुसार अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या कार्यात सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभेल, असे आवाहन केले. संचालन डॉ. रचना राठी,तर आभार डॉ. अर्पिता लड्ढा यांनी मानले. कार्यशाळेला पाचही जिल्ह्यातील वाणिज्य व व्यवस्थापन विषयाचे शिक्षक, प्राचार्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेच्या प्रथम सत्राचे अध्यक्षस्थान विद्यापीठ अधिसभेचे सदस्य डॉ. सुनिल पांडे यांनी भूषविले असून प्रमुख वक्ते म्हणून लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणीचे प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कला, वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचे प्राचार्य डॉ. दिलीप खुपसे उपस्थित होते. द्वितीय सत्राचे अध्यक्षस्थान वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. दिनेश निचित भूषविले असून यावेळी विद्या परिषदेचे सदस्य डॉ. मनोज पिंपळे उपस्थित होते. शैक्षणिक सत्रात व्यवसाय व्यवस्थापनचे डॉ. महेश गायकवाड व डॉ. महेश डाबरे, व्यवसाय अर्थशास्त्रचे डॉ. अरुणा वाडेकर व डॉ. तुषार कोटक, वाणिज्यचे डॉ. संग्राम रघुवंशी व डॉ. उदय काळे आणि लेखाशास्त्र व संख्याशास्त्रचे डॉ. जयंतकुमार गुप्ता यांचा सहभाग राहिला.



कार्यक्रमाला उपस्थित विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी,शिक्षक तसेच विद्यार्थी विद्यार्थीनी





# विद्यापीठात 'एन.ई.पी.-२०२० : उपलब्धी, आव्हाने व भविष्यवेध' विषयावर कार्यशाळा



## सामाजिक स्थिती बदलण्यासाठी शैक्षणिक दृष्टीकोन बदलण्याची गरज-कुलगुरू डॉ. आवलगांवकर



उद्‌घाटनीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भाषांना स्थान दिल्या गेले आहे. शिकण्याचं स्वातंत्र्य नवीन शैक्षणिक धोरण देते. आव्हाने तर अनेक आहेत, पण ते पेलवता आली पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळकटी देण्याचा प्रयत्न नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून झाला आहे आणि म्हणूनच सामाजिक स्थिती बदलण्यासाठी शैक्षणिक दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रिध्दपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगांवकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय चिंतन-मंथन कार्यशाळेमध्ये बीजभाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर कार्यशाळेचे उद्घाटक कुलगुरू मिलींद बारहाते, अध्यक्षस्थानी अ.भा. राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या अध्यक्ष डॉ. मीनलताई भोंडे, प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, अ.भा. राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे अमरावती विभाग महामंत्री डॉ. मंगेश अडगोकर, विद्यापीठाच्या आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदीप वाघुळे उपस्थित होते.

डॉ. आवलगांवकर म्हणाले, ब्रिटीशकालीन शैक्षणिक पध्दत वेगळी होती. कामासाठी माणसं तयार करण्याची ब्रिटीशांची पध्दत होती. देशात मात्र तसे नाही. भारताच्या प्राचीन शिक्षण पध्दतीत ज्ञानार्जन हा शिक्षणाचा मुख्य उद्देश होता. नवीन शैक्षणिक धोरण भाषिक स्वातंत्र्य देते, त्यामुळे त्याचा उपयोग घ्यावा. भविष्याचा वेध घेत असताना वर्तमानाचा विचार करणे आवश्यक आहे. एक आदर्श पिढी निर्माण करण्याचं काम हे शिक्षकांचे आहे. सर्वच क्षेत्रात संशोधनासाठी प्रयत्न करण्याची आज गरज आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची मुख्य भूमिका ही मानवकेंद्रीत असून मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा विचार नवीन शैक्षणिक धोरणामध्ये केला गेला आहे. प्रत्येक जण आत्मनिर्भर झाला, तर देश आत्मनिर्भर होण्यास वेळ लागणार नाही, असेही डॉ. आवलगांवकर म्हणाले.



कुलगुरू डॉ. अविनाश आवलगांवकर विषयाची मांडणी करतांना



व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्याधिष्ठीत शिक्षणावर भर– कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, मातृभाषेतून शिक्षण हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उद्देश आहे. कौशल्याधिष्ठीत शिक्षणावर नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भर देण्यात आला आहे. त्यातही त्या त्या प्रांतात स्थानिक कौशल्याला अधिक महत्व देण्यात आले आहे. सर्वसमावेशक आणि न्याय्यपूर्वक आणि दर्जेदार शिक्षण या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधून अधोरेखित करण्यात आल्या आहेत. एवढेच नाही, तर ट्रान्स जेंडरचा विचार सुध्दा पहिल्यांदाच या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आला आहे, जेणेकरुन ट्रान्स जेंडर यांनाही शिक्षण मिळाले पाहिजे. भारतीय ज्ञान परंपरेचा सुध्दा नवीन शैक्षणिक धोरणांत विचार करण्यात आला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे अनेक उपलब्धी सुध्दा झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शैक्षणिक क्षेत्रात अनेक आव्हाने आहेत, मात्र त्यावर मात करण्याचा प्रयत्न देखील विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. भविष्याचा वेध घेत असतांना सद्यस्थितीत ज्या अडचणी आहेत, त्यांचा विचार निश्चित केला जाईल. विकसित भारत २०४७ करिता सर्वांचा हातभार लागेल, असेही कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. होणारे बदल शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतात, त्यामुळे विद्यार्थ्यांना घडवण्याची जबाबदारी शिक्षकांनी पार पाडावी. कार्य करणारांच्या पाठीशी शासन आहेच, असे सांगून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समाज, पालक, विद्यार्थ्यांमध्ये रूजवावे लागेल, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. मिनलताई भोंडे म्हणाल्या, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाव्दारे शिक्षण घेतलेले विद्यार्थी निश्चितच सक्षम होऊन बाहेर पडतील. त्यासाठी सर्वांनी मिळून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण रूजवून ते फुलवावे. कार्यशाळांच्या माध्यमातून यातील गैरसमजही दूर करता येतील, असे सांगून एक सक्षम विद्यार्थी घडेल, यासाठी कार्यशाळेच्या माध्यमातून प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून डॉ. मंगेश अडगोकर यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. सूत्रसंचालन डॉ. प्रमोद गारोडे यांनी, तर आभार श्री ओमप्रकाश मुंदे यांनी मानले. कार्याशाळेला विद्यापीठाच्या पाचही जिल्ह्यांच्या महाविद्यालयांमधील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, महिला प्राध्यापक, शिक्षक, गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यशाळेला उपस्थित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक,शिक्षक,गुणवंत हमी कक्षाचे सदस्य तसेच विद्यार्थी

## नोकरी मागण्यापेक्षा देण्याचा मंत्र शिका
## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

# विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता प्रशिक्षण शिबिर





प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

आजघडीला आपल्या देशात मोठमोठ्या संधी उपलब्ध आहेत. केंद्र सरकारने सुध्दा अनेक योजना सुरू केल्या आहेत; ज्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्य घडविता येईल. नवनवी संकल्पना अंमलात आणा. जगाने जो नोकरी मागण्यापेक्षा देण्याचा मंत्र स्वीकारला आहे, तो मंत्र शिका व मोठे उद्योजक बना, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांकरिता आयोजित उद्योजकता प्रशिक्षण शिबिर प्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून प्रियदर्शनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, नागपूरचे संचालक डॉ. विवेक नानोटी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, इन्क्युबेशन सेंटरच्यावतीने चांगले उपक्रम राबविले जात आहेत. भविष्यातही आणखी अधिक चांगल्या प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांकरिता राबविले जातील. सेंटरमार्फत आयोजित स्पर्धेला सुध्दा मोठा प्रतिसाद मिळाला होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचाही आता चांगला प्रतिसाद मिळत आहे. आज विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. नवनवीन कल्पना हेरुन विद्यार्थ्यांनी उद्योग व्यवसायाकरिता प्रयत्न करावेत, असे सांगून उद्योजक व्हा, असा सल्ला देखील यावेळी कुलगुरुंनी विद्यार्थ्यांना दिला.

**मानसिकता बदला, नावीन्यपूर्णता आणा–डॉ. विवेक नानोटी**

आपण जगातील देशांकडे पाहून तेथील विकासाबद्दल बोलत असतो. परंतु आपणही जगाकडे पाहून पुढे जाण्यासाठी धडपडत राहिले पाहिजे. नावीन्यपूर्णता ही जगाने आत्मसात केली आहे व म्हणूनच आपण बलाढ्य देशांच्या विकासाकडे पाहून बोलत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मानसिकता बदलणे गरजेचे असून नावीन्यपूर्णता आत्मसात करावी. अमेकिरेसारखे देश याच नावीन्यपूर्णतेमुळे आज बलाढ्य झालेले आहेत. शिक्षकांनी सुध्दा वर्गात शिकवितांना विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्नांचा भडीमार सुरू होईल, असे शिकवावे. ते म्हणाले, उद्योजकता विकास हे सामाजिक बदलाचे स्वरुप आहे. अनेक आव्हाने आहेत, परंतु ध्येय ठरवले तर त्यावर आपण मात करू शकतो. येणारे दशक हे विकासाचे दशक असेल, त्यामुळे नावीन्यपूर्णता आत्मसात करुन आपला विकास साधा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी प्रशिक्षण शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन व आभार विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी मानले. प्रशिक्षण शिबिराला विद्यापीठाचे माजी प्र–



**शिबिराला उपस्थित शिक्षक तसेच विद्यार्थी**

कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विभागातील योगशास्त्राच्या योगपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड




**विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील एम.ए. योगशास्त्राच्या आशीष उमाकांत राजुरकर व ऋषिकेश गजानन डोईफोडे या दोन योगपटूंची छत्रपती संभाजीनगर येथे २९ ते ३१ ऑगस्ट रोजी होणा–या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

जिल्हा योगासन स्पोर्ट असोसिएशन व बृहन महाराष्ट्र स्पोर्ट असोसिएशनच्या विद्यमाने अमरावती शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथे नुकत्याच पार पडलेल्या योगासन स्पर्धेत आशीष उमाकांत राजुरकर याने ट्विष्स्टग बॉडी इंडीव्हीजनल प्रकारात सुवर्ण पदक तसेच पारंपारिक योग पध्दतीमध्ये रजत पदक, तर ऋषिकेश गजानन डोईफोडे याने फॉरवर्ड बेंड इंडीव्हीजनल प्रकारात रजत पदक पटकाविले. छत्रपती संभाजीनगर येथे होणा–या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेमध्ये ते अमरावती जिल्हाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

विद्यापीठाचा नावलौकीक करणा–या या दोन्ही योगपटूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बाराहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी अभिनंदन करुन राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# विद्यापीठात 'मानवी मनाचा चित्रीय शोध' विषयावर कार्यशाळा संपन्न

## केस नं. ७३ चित्रपटामधून मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न




कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागातर्फे टीचिंग रिसर्च डेव्हलपमेंट ॲन्ड एक्सटेन्शन ॲक्टिव्हिटी उपक्रमांतर्गत 'मानवी मनाचा चित्रीय शोध' विषयावर नुकतीच एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत केस नं. ७३ या चित्रपटामधून प्रख्यात मानसशास्त्रीय सल्लागार, दिग्दर्शक व निर्माते डॉ. मिलींद आपटे यांनी बाल लैंगिक छळ, त्यांचा व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत होणारा दूरगामी परिणाम प्रभावीपणे दाखविला. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. मंचावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय, समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी मानवी स्वभावावर होणा-या सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा परिणाम याविषयी मार्गदर्शन करताना दृकश्राव्य माध्यमांद्वारे गुंतागुंतीच्या मनोवस्थेचे चित्रण करून समाजजागृती साधता येऊ शकते, असे सांगितले.

डॉ. आपटे यांनी बाल लैंगिक शोषणाविरुध्द ठोस आवाज उठविण्याची आज नितांत गरज असून जनजागृतीसाठी विविध उपाययोजनांविषयी सांगितले. बालवयात आलेले अनुभव पुढे आपल्या व्यक्तिमत्त्वावर कसे खोलवर परिणाम करतात, चित्रपट हे केवळ कला किंवा मनोरंजनाचे साधन नसून मानसशास्त्राचा अभ्यास करण्याचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. दृकश्राव्य माध्यमांतून मानवी मनातील गुंतागुंतीचे स्तर प्रेक्षकांसमोर सहज व प्रभावी पध्दतीने मांडता येतात. आजच्या काळात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत असल्यामुळे विद्यार्थी आणि तरुण पिढीला संवेदनशील बनविणे अत्यावश्यक आहे. चित्रपटांचा वापर शैक्षणिक वातावरणात करून विद्यार्थ्यांना सहानुभूती, सामाजिक जाणिवा आणि विचारशक्ती विकसित करण्याची संधी देता येते. समाजात बदल घडविण्यासाठी सर्जनशीलता, संशोधन आणि संवेदनशीलता यांचा संगम आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

प्रस्ताविक डॉ. संयोगिता देशमुख, सूत्रसंचालन कु. अनुश्री आडे, तर आभार आयतल कामदार यांनी मानले. कार्यशाळेला विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सुमित गेडाम, सुमेध वडुरकर, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, अनुश्री आडे आदींनी परिश्रम घेतले.

# समाजातील शेवटच्या घटकाचा विकास हाच पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म विचार – डॉ.खर्चे

## विद्यापीठात एकात्म मानव दर्शन कार्यशाळेचे उद्‌घाटन



अध्यक्षीय विचार मांडतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार हा अखिल मानवाच्या सुखाचा विचार आहे व तो समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा असा एकात्म विचार आहे, असे मौलिक विचार विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य व कार्यशाळेचे बीजभाषक डॉ. नितीन खर्चे यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, उद्घाटक म्हणून व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.

डॉ. खर्चे म्हणाले, १९६५ मध्ये पं. दीनदयाल उपाध्याय यांची चार दिवस चार भाषणं झाली आणि त्यातून त्यांचा एकात्म मानव दर्शन विचार पुढे आला. अखिल मानवजातीच्या विचाराचे पूर्वीपासूनच आपल्या देशात बीजारोपण झाले. पं. दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार संत साहित्यातही आहे. आपण जे काही करतो, त्यात सुखाचा विचार असतो आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांनीही मानवी सुखाचा विचार आपल्या एकात्म दर्शनातून मांडला. अंत्योदय अर्थात समाजातील शेवटचा घटक म्हणजे कुटुंब असे पं. दीनदयाल मानतात. कुटुंब व्यवस्थेमुळे आपली संस्कृती टिकून आहे. नातीगोती सुध्दा एकात्म भावामुळेच एकमेकांशी पुरक आहेत. एकात्म भावामुळेच आपण एकमेकांच्या मदतीला धावत असतो. त्यामुळे आपण सृष्टीशी एकरुप असले पाहिजे असे पं. दीनदयाल उपाध्याय यांनी म्हटले आहे. व्यष्टी, समेष्टी, सृष्टी आणि परमेष्टी असा विचार पं. दीनदयाल उपाध्याय यांनी दिला. एवढेच नाही, तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा पुरुषार्थातून चांगले आचारविचार, त्यातून अर्थार्जन आणि सुख अशी कल्पना पं. दीनदयाल उपाध्याय यांनी मांडली.



कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ. नितीन खर्चे

सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी यांनी आपापल्या महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार पोहचवावा, असे आवाहन याप्रसंगी डॉ. नितीन खर्चे यांनी उपस्थितांना केले.

कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याचे घोषित करुन व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू म्हणाले, शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत त्याच्या सर्वांगीण विकासाच्या सर्व बाबी पोहचल्या पाहिजेत. त्यांना मदत केली पाहिजे. विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार पोहचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



उद्‌घाटनीय भाषण करतांना व्य.प.सदस्य डॉ. रविंद्र कडू

**कार्यशाळेच्या माध्यमातून पं. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल–कुलगुरू**

अध्यक्षीय विचार मांडतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा, या उदात्त हेतुने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आणि प्रतिसादही उत्स्फूर्तपणे मिळाला. देशाच्या जडणघडणीत अनेक महापुरुषांचा हातभार लागला आहे. त्यात पं. दीनदयाल उपाध्याय यांचा सुध्दा हातभार लागला. तरुणवर्गात त्यांचे विचार पोहचविणे हे आपले कर्तव्य आहे व बीजभाषकांनी सुध्दा अगदी सोप्या भाषेत पं. दीनदयाल उपाध्याय यांचे मौलिक विचार मांडलेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांच्या विचाराशी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या विचाराचे साम्य आहे, असे सांगून सर्व कार्यक्रम अधिकारी यांनीही आपापल्या महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार पोहचवावेत, असे आवाहन याप्रसंगी कुलगुरुंनी केले.

संत गाडगे बाबा, पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून डॉ. राजीव बोरकर कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी विविध राज्य, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेवून विद्यापीठाचा नावलौकीक करणारे विद्यार्थी चेतन खापरे, शिवम शर्मा, प्रथमेश अडायगे, क्रिश आत्राम, प्रगती सुधा, मो. अफसर मो. साबीर यांचा तसेच चमू व्यवस्थापक श्री सावन देशमुख, डॉ. नेत्रा मानकर, अभिजित भावे यांचा, विद्यार्थी विकास विभागाने आयोजित केलेल्या घोषवाक्य स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या



व्ही.ए. गायकवाड, डॉ. डी.एन. लांजेवार व प्रा. प्रणाली चांदुरकर यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठ विविध प्राधिकारिणींचे सदस्य, विभागाच्या पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, चमू व्यवस्थापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.



कार्यशाळेला उपस्थित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य,कार्यक्रम अधिकारी,विद्यार्थी व विद्यार्थीनी








विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन विद्यापीठाचे नाव लौकीक करणारे विद्यार्थी, चमू व्यवस्थापक तसेच घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते





विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन विद्यापीठाचे नावलौकीक करणारे विद्यार्थी,चमू व्यवस्थापक तसेच घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

# प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबराव महाराजांनी विविध ज्ञान क्षेत्रामध्ये दिलेले योगदान अतुलनीय - डॉ. अरविंद देशमुख

## प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला संपन्न



विचारपीठावर उपस्थित मान्यवर

संत गुलाबराव महाराजांनी साहित्य, तत्वज्ञान, संगीत, वैद्यकीय आदी ज्ञान क्षेत्रामध्ये सांगितलेले ज्ञान व त्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते डॉ. अरविंद देशमुख यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात संपन्न झाली, त्याप्रसंगी 'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज यांचे विविध ज्ञानक्षेत्रातील योगदान' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून व्याख्यान देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, ब्रजलाल बियाणी शिक्षा समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री ओमप्रकाशजी लड्ढा, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य डॉ. दिपक धोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. देशमुख पुढे म्हणाले, महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. संत परंपरा महाराष्ट्राचा प्राण आहे आणि प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे संत परंपरेतील एक संत आहे. या संत परंपरेत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते आजपर्यंतच्या विविध संतांनी समाजकल्याणासाठी योगदान दिलेले आहे. संत गुलाबराव महाराजांनी संस्कृत भाषेसह विविध भाषेमध्ये विपुल ग्रंथसंपदा समाजाला उपलब्ध करुन दिली आहे. भारतीय संस्कृतीचे दर्शन त्यांच्या साहित्यातून होते. भारत मातेला डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी आपले कार्य केले आहे. भारतीय वैदिक संस्कृती महान असल्याचे ठासून सांगणारे संत गुलाबराव महाराज सर्वश्रेष्ठ आहे.

पुढे म्हणाले, ते जागतिक तत्वचिंतक असून शिक्षणातून सुसंस्काराचे दान मिळायला पाहिजे. भौतिक समृद्धी ज्यावेळी वाढेल, त्यावेळी मनुष्याची आत्मशांती कमी होईल आणि म्हणून महाराजांनी आत्मशांतीसाठी भक्तीमार्गाचा उपदेश केला. भक्ती कशी असावी, तर महाराजांनी भक्तीचा संबंध मनाशी लावला. गुलाबराव महाराजांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर डॉ. देशमुख यांनी व्याख्यानातून प्रकाश टाकला. गुलाबराव महाराजांचे विचार प्रत्येक विद्यार्थ्यांनी आत्मसात करुन आपली बौद्धिक व सांस्कृतिक पातळी उंचावली पाहिजे, त्यातूनच सुसंस्कृत विद्यार्थी घडू शकेल.

ज्ञानेश्वर माऊलींना गुलाबराव महाराजांनी पूर्ण शरणागती दिली. त्यांनी सांगितले, जिथे श्रद्धा तिथे ईश्वर आहे. सर्वसामान्य माणसांचे कल्याण व्हावे, यासाठी महाराजांनी ग्रंथातून विचार दिले. मराठी साहित्यामध्ये अशाप्रकारचे साहित्य लिहीणारे दुसरे संत होऊन गेले नाही, असे सांगून जगातील सर्व धर्माचे लोकं एकत्र नांदू शकतील, एवढी ताकद गुलाबराव महाराजांच्या साहित्यात असल्याचे त्यांनी सांगितले.



विषयाची मांडणी करतांना डॉ. अरविंद देशमुख




अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

## संत परंपरेचा अभिमान बाळगा – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली आहे. अमरावती जिल्हामध्ये अनेक महान संत होऊन गेले. या संतांच्या तत्वज्ञानाचा, कार्याचा व शिकवणूकीचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, यासाठी अशाप्रकारच्या व्याख्यानाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. डॉ. अरविंद देशमुख यांनी विषयाच्या अनुषंगाने गुलाबराव महाराजांच्या विविध ज्ञान क्षेत्रातील योगदानावर सविस्तर विवेचन केले. कुलगुरू पुढे म्हणाले, आज विद्यार्थ्यांची सहनशक्ती कमी झाली आहे. तरुण वर्ग मोबाईल तसेच नव्याने लक्षात आले की, ड्रग्सच्या आहारी जात आहे. समाजासमोर अनेक समस्यां व आव्हाने आहेत. हे जरी असले, तरी विद्यार्थ्यांनी वर्गात न जाणे, गुन्हेगारी व व्यसनाधीन आदी बाबींकडे वळणे, या गोष्टींकडे पालकांनी लक्ष देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी सुद्धा अंतर्मुख होऊन सजग झाले पाहिजे. आज तरुणांना योग्य दिशा देण्याची गरज आहे. त्यांना संत विचारातून निश्चितच दिशा मिळू शकेल. याप्रसंगी आवाहन करतांना कुलगुरू म्हणाले, विद्यार्थ्यांनी संत परंपरेचा अभिमान बाळगावा, त्यांच्या विचार व कार्याचा अभ्यास करावा आणि आधुनिकतेची कास धरतांना संत परंपरा जपावी, असे सांगितले.

सरस्वती वंदन, राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गुलाबराव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. दिपक धोटे, तर प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. संचालन व आभार डॉ. सुरुची कडू यांनी केले. कार्यक्रमाला ब्राजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक राठी, श्री संत गुलाबराव महाराज भक्तिधामचे अध्यक्ष श्री रविंद्र इंगोले, संरक्षक श्री पंडीत मोहोड, कोषाध्यक्ष श्री मोरेश्वर मोहोड, श्री अरुण इंगोले, श्री व्ही.के. खांडे, आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच संत गुलाबराव महाराजांचे भाविक भक्त, नागरिक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



व्याख्यान कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक,संत गुलाबराव महाराजांचे भक्त, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी




## संतांनीच देशाला संस्कृतीची ओळख करुन दिली - डॉ. स्वप्नील इंगोले

### विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती व्याख्यानमाला



अध्यक्षीय भाषण करतांना न.न.सा. संचालक डॉ. अजय लाड

संतांनीच देशाला संस्कृतीची ओळख करुन दिली, असे विचार श्रीमती राधादेवी गोयनका महाविद्यालय, अकोला येथील मराठी विभागप्रमुख डॉ. स्वप्नील इंगोले यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित 'मराठी संत परंपरा आणि राष्ट्रसंतांचा मानवतावाद' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, प्रमुख अतिथी म्हणून प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा, जि. वाशिमचे अध्यक्ष श्री सुभाषराव ठाकरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एच. कान्हेरकर, आचार्य हरिभाऊ वेरुळकर उपस्थित होते.

डॉ. इंगोले म्हणाले, संत ज्ञानेश्वरांनी संत परंपरेचा पाया रचला. संतांनी लोकांच्या मनाला हात घालून त्यांना वाट दाखविली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून जीवन जगण्याचा मंत्र दिला. खेडोपाडी राष्ट्रसंतांचे विचार पोहचले. त्यांच्या विचारातून खेडी समृध्द होत आहे. त्यांनी सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली. महिलांचा सन्मान केला. या देशाचे युवक बलीशाल व्हावेत, यासाठी ग्रामगीतेतून विचार व कृती दिली. संत गाडगे बाबा विज्ञानवादी संत होते. संत हे अनुभवाचे सागर आहेत. शामराव दादा मोकदम, ग्रामगीताचार्य तुकारामदादा, सुदाम सावरकर हे संत साहित्याचे पाईक आहेत, असे सांगून व्याख्याते डॉ. इंगोले यांनी संत ज्ञानेश्वरापासून तर संत गाडगे बाबांपर्यंत संत परंपरा उलगडून दाखविली.



विषयाची मांडणी करतांना डॉ. स्वप्नील इंगोले

प्रमुख अतिथी श्री मधुभाऊ घारड म्हणाले, स्वातंत्र्यासाठी लाखो लोकांनी बलिदान दिले. त्यांच्यामुळेच आपण आज स्वातंत्र उपभोगतो आहोत. राष्ट्रसंतांच्या विचारावर अनेक विद्यापीठांनी संशोधन केले आहे. संत साहित्यावर अनेक संमेलने सुध्दा झालीत. स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रसंत आणि शामरावदादा मोकदम यांचे मोठे योगदान होते, असेही ते म्हणाले.

श्री सुभाषराव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राला, देशाला संतांनी कतृत्वाची झलक मुद्देसुद दाखविली. संतांनी त्या काळात सांगितलेल्या गोष्टींचे आज अनुपालन होत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा हे आमचे दैवत आहेत व त्यांच्या विचारकार्यानेच आम्ही आज कार्य करीत आहोत. शामरावदादा मोकदम यांची स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना साथ होती.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजय लाड म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना आता आवडीचे शिक्षण घेता येते. विद्यापीठाचे सुध्दा कौशल्यधारित शिक्षण देण्याचे धोरण आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थीभिमुख प्रकल्प राबवावेत, जेणेकरुन विद्यार्थी आपले भविष्य घडवू शकतील. विद्यार्थ्यांनी सुध्दा आपल्या मनातील संकल्पना वास्तवात आणाव्यात, असे आवाहन करुन विद्यापीठाच्या अध्यासन केंद्रांना शाळांसोबत जोडण्याचा प्रयत्न विद्यापीठाकडून सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. राष्ट्रसंतांचा मानवतावाद विद्यार्थ्यांनी घरोघरी पोहचवावा, असेही आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व शामरावदादा मोकदम यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.एच. कान्हेरकर यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रमोद देवके, तर आभार डॉ. शरद वाघोळे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.



व्याख्यान कार्यक्रमाला उपस्थित प्राध्यापक,शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी व राष्ट्रसंतांची भक्त मंडळी

# लैंगिक समानता साध्य करण्यासाठी महिला सक्षमीकरण आवश्यक
## प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

आज जगभरात लैंगिक समानता अस्तित्वात आणण्यासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत. त्यातीलच एक प्रभावी प्रयत्न महिला सक्षमीकरणाचा आहे. लैंगिक समानतेसाठी व्यापक समाज परिवर्तन घडण्याची प्रक्रिया सुरू असली तरी ती दीर्घकाळ चालणारी आहे. अशावेळी स्त्रियांच्या व्यावहारिक आवश्यकता ओळखून कार्य करणे गरजेचे ठरते. त्यादृष्टीने महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न सुरू आहेत. आज स्त्रियांच्या स्थितीत दिसून येणारा सकारात्मक बदल हा सक्षमीकरणासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांचीच उपलब्धी म्हणता येईल. मात्र अजूनही त्यादृष्टीने बरीच वाटचाल करणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरतात, त्यातून समाजात जाणीव जागृती होण्यास मदत मिळते. तसेच लैंगिक समानतेसाठी त्यातून हातभार लागतो, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान - पीएम उषा अंतर्गत 'महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समानता' या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. विचारमंचावर उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य डॉ. मनीषा कोडापे, वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक व कार्यक्रम समन्वयक डॉ. वैशाली गुडधे यांसह वुमेन्स स्टडीज सेंटरच्या सहसमन्वयक डॉ. वैशाली धनविजय उपस्थित होत्या.

आपल्या उद्घाटनपर मनोगतात डॉ. मनीषा कोडापे म्हणाल्या, लैंगिक असमानतेमुळे आजही स्त्रियांना विकासासाठी मोठ्या प्रमाणात सामाजिक पूर्वग्रहांचा आणि संसाधनांच्या अभावाचा सामना करावा लागतो. परिणामी स्त्रियांचा विकास होत नाही. म्हणून सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा जीवनाच्या एकूणच सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण आजही पुरेसे नाही. आजही स्त्रिययांना रोजगार आणि व्यवसाय करण्यासाठी अडचणी येतात. ही स्थिती सुधारण्यासाठी समाजाचा सर्वांगीण विकास घडून आणण्यासाठी लैंगिक समानतेची आवश्यक आहे. त्यासाठी महिला सक्षमीकरण



व्य.प.सदस्य डॉ. मनिषा कोडापे विचार व्यक्त करतांना

हे एक प्रभावी साधन आहे. आज शासनाच्या विविध योजना, धोरणे आणि विविध वित्त संस्थांद्वारे महिलांच्या विकासासाठी देण्यात येणारे अनुदान उपलब्ध आहे. त्यापर्यंत स्त्रियांची पोहच वाढवणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी मोठी सोय करून दिली आहे. त्याचा लाभ स्त्रियांनी घेऊन आत्मनिर्भर झाले पाहिजे.

डॉ. वैशाली गुडधे यांनी आपल्या प्रास्ताविकात, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम द्वारा प्रकाशित झालेल्या ग्लोबल जेंडर गॅप अहवाल २०२५ मधील लैंगिक असमानतेच्या स्थितीचा संदर्भ देऊन या संवेदनशील विषयावर प्रभावी कार्य करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्देश स्पष्ट करून वुमेन्स स्टडीज सेंटरचा परिचय दिला. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. भगवान फाळके यांनी केले. सदर कार्यशाळेला यावेळी प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यापीठात 'श्री चक्रधरस्वामी व लीळाचरित्र' विषयावर व्याख्यान

## श्री चक्रधरस्वामी ईश्वरीय अवतार – प्रा.वसंत आबाजी डहाके



विषयाची मांडणी करतांना प्रा. वसंत आबाजी डहाके

समाजात जावून लोकांशी संवाद साधत जनजागृती करणारे श्री चक्रधरस्वामी ईश्वरीय अवतार आहेत, अशा आशयाचे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राच्यावतीने श्री चक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त आयोजित 'श्री चक्रधरस्वामी व लीळाचरित्र' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून प्रसिध्द कवयित्री व समीक्षक डॉ. प्रभाताई गणोरकर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. अशोकराव राऊत, अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा. वसंत आबाजी डहाके म्हणाले, गुजरात येथून आल्यानंतर श्री चक्रधरस्वामींनी गोविंदप्रभूंची भेट घेतली आणि तेथेच त्यांचा अनुग्रह झाला. लीळाचरित्राची पार्श्वभूमी सांगतांना प्रा. डहाके यांनी लीळाचरित्र कशाप्रकारे लिहिल्या गेले, चक्रधरस्वामींचे महाराष्ट्रभर भ्रमण, लोकांशी संवाद, उत्तरापंथी गमन अर्थात लोकांपासून दूर जाणे आदी बाबींवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. लीळाचरित्र लिहितांना त्यांचा आधी उत्तरार्ध नंतर पूर्वार्ध आणि शेवटी एकांक लिहिल्या गेल्याचे ते म्हणाले. म्हाइंभट्ट यांना लीळाचरित्र संपूर्ण पाठ होते व त्यानंतर ते लिहिल्या जावून जनतेपर्यंत कसे पोहचले यावरही प्रा. डहाके यांनी प्रकाश टाकला. महानुभाव वाड्.मय मराठी भाषेचं वैभव असून त्याचा अभ्यास व्हावा, असे आवाहन देखील त्यांनी याप्रसंगी केले.




विद्यापीठाच्यावतीने प्रा. वसंत आबाजी डहाके यांचा सत्कार करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे





व्याख्यान कार्यक्रमाला उपस्थित महानुभाव पंथीय महिला-पुरूष मंडळी तसेच गणमान्य नागरिक

प्रमुख अतिथी डॉ. प्रभाताई गणोरकर म्हणाल्या, महानुभाव तत्वज्ञान विलक्षण असून, गोविंदप्रभू एक विलक्षण व्यक्तिमत्व होते. लीळाचरित्रातील अनेक प्रसंग सांगतांना डॉ. गणोरकर यांनी अनेक दृष्टांत देखील विषद केले. गोविंदप्रभूंकडून श्री चक्रधरस्वामींना स्थैर्य कसे मिळाले, याचाही एक प्रसंग त्यांनी यावेळी उपस्थितांना सांगितला.

अध्यक्षीय भाषणातून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, ज्यांचे नाव फक्त ऐकले होते, त्यांना प्रत्यक्ष पाहून त्यांचे विचार ऐकता आले हे आपले भाग्य आहे. विषयाची मांडणी देखील प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी मुद्देसुदपणे केली. त्याकाळची परिस्थिती, दृष्टांत व्याख्यातांनी सांगितले, ते ऐकून मन तृप्त झाल्याचेही प्र-कुलगुरू म्हणाले.

श्री चक्रधरस्वामींच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी, तर आभार प्रा. संदीप तडस यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांच्यासह अमरावती शहर तसेच शहराबाहेरील महानुभाव पंथीय महिला, पुरुष, गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# शरीर स्वास्थ्यासाठी खेळाडू वृत्ती ठेवा - कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठातील क्रीडा - शारीरिक शिक्षण विभाग व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त क्रीडा स्पर्धांचे आयोजन



फित कपून उद्घाटन करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

शरीर, मन स्वास्थ्यासाठी खेळ महत्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळाडू वृत्ती ठेवावी, असे आवाहन कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचे कुलगुरूंनी फित कापून उद्घाटन केले, त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अजयपाल उपाध्याय यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

डॉ. अजयपाल उपाध्याय मार्गदर्शन करतांना म्हणाले, खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून, आरोग्य हेच खरे धन आहे. पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत म्हणाल्या, संघभावना, सहकार्य, शिस्त, प्रामाणिकपणा या गुणांचा विकास खेळांतूनच होतो. खेळाचे जीवनात अपार महत्व असून प्रत्येकाने अभ्यासासोबतच खेळालाही तितकाच वेळ द्यावा.

विद्यार्थ्यांसाठी व्हॉलिबॉल व रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये एम.बी.ए., शारीरिक शिक्षण, वसतीगृह, भौतिकशास्त्र, गृह विज्ञान, संगणकशास्त्र, विभागाच्या विद्यार्थी संघाने भाग घेतला. 'एक घंटा खेल के मैदान मै' असा नारा देऊन विद्यार्थ्यांना क्रीडा दिवसानिमित्त शपथ देण्यात आली. याप्रसंगी विभागाचा माजी खेळाडू डॉ. अभिजीत इंगोले यांना श्री शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचा शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ.विजय निमकर, डॉ.निलेश इंगोले, डॉ.सौरभ त्रिपाठी, कु. सविता बावनथडे, विविध विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. कु. निकिता भट हिने आभार मानले. पल्लवी शिंदे, शीतलदेवी यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.




मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

# क्रीडा स्पर्धेतील क्षणचित्रे











## ग्रंथपालांनी नवीन तंत्रज्ञानाद्वारे वाचकांना विविध सुविधा पुरवाव्यात - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठात 'डी-स्पेस वापरुन डिजिटल लायब्ररी तयार करणे' विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन




व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

आजचे युग हे डिजिटल युग आहे. माहिती तंत्रज्ञानाने जगाला जवळ आणले. बदलत्या काळात ज्ञानाचे संकलन, जतन आणि प्रसार करण्यासाठी पारंपारिक पद्धती पलीकडे जावून डी–स्पेस सारख्या तंत्रज्ञानाचा अवलंब करुन ग्रंथपालांनी विविध सुविधा वाचकांना पुरवाव्यात, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्र आणि युजीसी – मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटर यांचे संयुक्त विद्यमाने 'डी–स्पेस वापरुन डिजिटल लायब्रारी तयार करणे' या विषयावर द्विदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठ परिसरातील ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले, त्याच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, रिसोर्स पर्सन म्हणून उस्मानिया विद्यापीठाचे डॉ. रमेश पारिची, ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, युजीसी – मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटरचे संचालक डॉ. मोहम्मद अतीक व ज्ञानस्त्रोत केंद्राचे सहसमन्वयक डॉ. विशाल बापते उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, डिजिटल लायब्र रीमुळे केवळ पुस्तकच नव्हे, तर संशोधन प्रबंध, शोधनिबंध, अहवाल आणि इतर अनेक प्रकारची माहिती एका क्लीकवर उपलब्ध झाली आहे. त्यामुळे संशोधक विद्यार्थी आणि ज्ञान प्रेमींसाठी ज्ञानाची क्षितीजे आणखी खुली झाली आहेत. आजच्या कार्यशाळेच्या निमित्ताने सहभागी ग्रंथपालांना डिजिटल लायब्ररीच्या निर्मितीमध्ये एक नवी दिशा यातून मिळेल आणि त्यादृष्टीने भविष्यात आमचे सर्व ग्रंथपाल विद्यार्थ्यांना व वाचकांना अधिक सुविधा पुरवतील, असेही ते म्हणाले. विद्यापीठ ज्ञानरुोत केंद्राने या कार्यशाळेच्या निमित्ताने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असून डी–स्पेस तंत्रज्ञानाचा उपयोग डिजिटल लायब्ररी तयार करणे, त्याचे व्यवस्थापन आणि प्रभावीपणे वापर आदी विषयाची माहिती या कार्यशाळेमध्ये सहभागींना मिळणार आहे.




मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे केंद्राव्दारे दिल्या जाणाऱ्या सुविधांचा आढावा घेतांना

प्रमुख अतिथी डॉ. रविंद्र कडू उपस्थितांना संबोधित करतांना म्हणाले, आपण सर्वजण 'डी–स्पेस वापरुन डिजिटल लायब्ररी तयार करणे' या विषयावर विचारमंथन करण्याकरीता एकत्रित आलो आहोत. ज्ञान साधनांच्या या प्रवासात डिजिटल लायब्ररी काळाची गरज बनली आहे. माहितीचे वाढते प्रमाण, संशोधन आणि शैक्षणिक गरजा लक्षात घेता एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्म असणे अत्यंत महत्वाचे आहे. पंचवीस वर्षानंतरही डी–स्पेस अग्रावली इन्स्टिटयुशनल रिपॉझिटरी विकसित करण्यासाठी यथोचित असल्याचेही ते म्हणाले. आजची कार्यशाळा सहभागी सर्वांकरीता खूप उपयुक्त ठरेल आणि यातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग सर्वजण आपल्या संस्थांमध्ये चांगल्या प्रकारे करतील, अशी आशा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

विद्यापीठ गीताने व मान्यवरांचे स्वागत करुन कार्यशाळेला सुरुवात झाली. प्रास्ताविकतेतून ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे यांनी केंद्राद्वारे दिल्या जाणाऱ्या सुविधा व त्याचा महाविद्यालयांना आणि विद्यार्थ्यांना होत असलेला उपयोग, यावर प्रकाश टाकला. यावेळी उस्मानिया विद्यापीठाचे डॉ. रमेश पारिची यांनी डी–स्पेस वर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे त्रुशाल गुल्हाने यांनी, तर आभार सहसमन्वयक डॉ. विशाल बापते यांनी मानले. कार्यशाळेमध्ये विदर्भासह पुणे, मुंबई, नाशिक, जळगाव आणि इतर जिल्हांतून जवळपास दोनशेचे वर ग्रंथपाल सहभागी झाले होते.




मार्गदर्शन करतांना डॉ. रविंद्र कडू






## शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांनी मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करावे-प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

# विद्यापीठात अँटी रॅगिंग सप्ताहाचा शुभारंभ



अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

शिक्षण घेत असतांना आपल्यासमोर भविष्य असते, स्वप्न असते व ते पूर्ण करण्यासाठीच आपण शिक्षण घेत असतो, मात्र शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताल मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण केले पाहिजे, असे आवाहन प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मंगळवार दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी राष्ट्रीय अँटी रॅगिंग डे व सप्ताहाचा शुभारंभ प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते झाला, त्याप्रसंगी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना ते बोलत होते. मंचकावर अँटी रॅगिंग स्कॉडचे अध्यक्ष डॉ. प्रणव कोलते, नोडल ऑफिसर डॉ. प्रशांत ठाकरे, स्कॉडच्या सदस्य डॉ. कल्पना जावळे उपस्थित होते.

प्र–कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मी सुध्दा विद्यार्थी होतो. त्याही वेळी विद्यापीठ कॅम्पसमध्ये कधीही रॅगिंगचा प्रकार घडला नाही आणि आताही नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुढेही असेच वातावरण निर्माण करावे. आयुष्याची शिदोरी म्हणजे शिक्षण असते. आपले व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांनी घडवावे. सप्ताहभर होणा–या कार्यशाळेमध्ये सहभागी होवून त्यातून माहिती घ्यावी व त्याचे अनुकरण करावे. तसेच सिनियर विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्टुडंट इंडेक्स प्रोग्रामनुसार आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

अँटी रॅगिंग स्कॉडचे नोडल ऑफिसर डॉ. प्रशांत ठाकरे यांनी अँटी रॅगिंग सप्ताह आयोजनामागील भूमिका मांडतांना महाराष्ट्रात काही ठिकाणी झालेल्या रॅगिंगचे प्रकार व त्यानंतर झालेल्या कारवाईबाबत विद्यार्थ्यांना अवगत केले. प्रास्ताविकातून डॉ. प्रणव कोलते यांनी अँटी रॅगिंग डे व सप्ताहाच्या आयोजनाचे महत्व विषद केले. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार अँटी रॅगिंग स्कॉडच्या सदस्य डॉ. कल्पना जावळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थित शिक्षक तसेच विद्यार्थी



# विद्यापीठात डॉ. रंगनाथन जयंतीनिमित्त अभिमुखता सोहळा संपन्न
## ज्ञानस्त्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे आयोजन



व्य.प.सदस्य तथा कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ.मनिषा कोडापे विचार व्यक्त करतांना

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात डॉ. एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्ताने ज्ञानस्त्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने अभिमुखता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे उपस्थित होत्या.

यावेळी डॉ. मनिषा कोडापे यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयाव्दारे उपलब्ध आधुनिक सुविधा, विद्यार्थी ते संशोधक असा प्रवास करीत असतांना सुविधांचा उपयोग याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणातून डॉ वैशाली गुडधे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञानस्त्रोत केंद्राकडून पुरविल्या जाणा-या सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. त्याचबरोबर विविध माहिती स्त्रोतांचे सादरीकरण, ज्ञानस्त्रोत केंद्रातील नियतकालिके, ऑनलाइन डाटाबेसेस, रिमोट ॲक्सेस सुविधा, चॅट जीपीटीचा वापर करून स्कोपस आणि वेब ऑफ सायन्स या डाटा बेसेसमध्ये माहिती कशी शोधायची याचेही सादरीकरण केले.

प्रास्ताविकातून ज्ञानस्त्रोत केंद्राचे सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विशाल बापते यांनी डॉ. रंगनाथन यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन श्री तृशाल गुल्हाने, तर आभार अश्विनी मुळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्योती गेडाम, तृशाल गुल्हाने, शितल नासणे, सोनल उताणे, अजय पाचगडे, स्वाती शिंदे, स्नेहल मुळे, माणिक बोरकर यांनी अथक परिश्रम घेतले.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. वैशाली गुडधे



कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनी

# 'ॲम्बिशन ॲन्ड ॲक्शन : इंडियाज नेट झिरो कार्बन स्ट्रॅटेजी' विषयावर चर्चासत्राचे उद्घाटन




## कार्बनमुळे होणारे दुष्परिणाम थांबवण्याची नितांत गरज-प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे


विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

उपयुक्त असलेल्या कार्बनचे आज दुष्परिणाम दिसत आहे. मात्र त्यासाठी आज समाजजागृतीची गरज असून, शासनाने सुध्दा आता कार्बनपासून होणारे दुष्परिणाम टाळले जावे, यासाठी इलेक्ट्रीकल वाहने आणली आहेत. मात्र तरीही कार्बनपासून होणारे धोके टाळण्यासाठी समाजजागृतीची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील केमिकल टेक्नॉलॉजी विभाग आणि 'द इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे अमरावती विभागीय अध्यक्ष श्री शरद मोहोड, नागपूर येथील निसर्गिकाचे संचालक व द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे समन्वयक श्री संजय गुल्हाने, सचिव श्री राम विघे, श्री गणेश बारब्दे, केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. ए. बी. नाईक, समन्वयक डॉ. प्रशांत शिंग्वेकर उपस्थित होते.



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना श्री शरद मोहोड

डॉ. ढोरे पुढे म्हणाले, एकेकाळी उपयुक्त असलेला कार्बन आज उपद्रवी ठरतो आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या केमिकल ॲन्ड टेक्नॉलॉजी विभागाने आयोजित केलेल्या या चर्चासत्राच्या माध्यमातून कार्बनमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी काय उपाययोजना करता येईल, यावर उहापोह होईल व विद्यार्थी सुध्दा त्यातून खूप काही शिकतील. विद्यार्थ्यांनी सुध्दा समाजाप्रती आपली जबाबदारी म्हणून जागृती करावी असे सांगून त्यांनी केमिकल टेक्नॉलॉजी विभागाचे अभिनंदन केले.

अध्यक्षीय भाषणात श्री शरद मोहोड म्हणाले, कार्बनमुळे होणारे दुष्परिणाम टाळता यावे, यासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न सुरू आहेत. कार्बनपासून होणारे दुष्परिणाम टाळणे आवश्यक आहे. पर्यावरणाला कार्बनमुळे निर्माण झालेला धोका लक्षात घेवून पर्यावरण रक्षणासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहे. विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहे. त्यामुळे देश विकासामध्ये पर्यायाने पर्यावरण रक्षणासाठी त्यांचा सक्रीय सहभाग आवश्यक असून, त्यांनी मोठ्या प्रमाणावर पुढे येण्याचे आवाहन देखील श्री शरद मोहोड यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा व श्री विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागतपर तसेच प्रास्ताविक श्री संजय गुल्हाने यांनी केले. श्री गणेश बारब्दे यांनी मनोगतातून चर्चासत्राचा उद्देश सांगितला. सूत्रसंचालन तृप्ती बारबुध्दे यांनी, तर आभार डॉ. प्रशांत शिंगेकर यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला द इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्सचे पदाधिकारी, विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


चर्चासत्राला उपस्थित विद्यार्थी



# समतेचा मूळ स्त्रोत तथागत गौतम बुध्द- डॉ. अनिल बैसाने विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राची व्याख्यानमाला



अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

समतेचा मूळ स्त्रोत तथागत गौतम बुध्दच आहे आणि संत कबीर, संत तुकाराम महाराज यांच्यावरही तथागत गौतम बुध्दाच्याच विचारांचा प्रभाव होता. एवढेच नाही, तर विदेशातील मोठमोठ्या ज्ञानवंतांनी जो समतेचा संदेश दिला, तो सुध्दा बुध्दाच्या विचारसणीचाच भाग आहे, मात्र भारतातील तथागत गौतम बुध्दाच्या समतेचे रोपण विदेशात झाले आणि भारताने पुन्हा विदेशातून समतेचे रोपटे आपल्या देशात रुजविले, असे प्रतिपादन धुळे येथील प्रसिध्द व्याख्याते प्राचार्य डॉ. अनिल बैसाने यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित 'छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतावादी दृष्टीकोन' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलकुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, महाराष्ट्र पुरोगामी विचारांचे राज्य आहे. छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उद्देशही एकच होता. सयाजीराव गायकवाड यांनी छत्रपती शाहू महाराजांना जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विदेशात शिष्यवृत्तीमुळे शिक्षण घेत आहे, असे सांगितले, तेव्हा शाहू महाराजांनाही खूप आनंद झाला आणि त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी मदत केली. त्यांची मुंबई येथे स्वत: भेट घेऊन कोल्हापूर संस्थानात बोलविले व त्यांचा जरीपटका बांधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मोठा सन्मान केला. एवढेच नाही, तर १९२० मध्ये झालेल्या अस्पृश्य परिषदेचे अध्यक्षपद सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले, असेही डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, समता ही बुध्दतत्वज्ञानातून मिळते.



विषयाची मांडणी करतांना डॉ. अनिल बैसाने

राजश्री शाहू महाराज ख-या अर्थाने चॅरिटी बिंइंग ऑफ होम असे म्हणून ते उपभोगशून्य स्वामी होते, असे प्र-कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले.

संत गाडगे बाबा, छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, मेणबत्ती प्रज्वलित करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड यांनी, सूत्रसंचालन डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी, तर आभार श्री रघू राळे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विद्यापीठाच्या वाटचालीत कर्मचा-यांच्या कुटुंबियांचेही योगदान - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांना सन्मानपूर्वक निरोप


अध्यक्षीय विचार मांडतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

एखाद्या संस्थेला सेवा देतांना कर्मचा–यांचे अर्धे आयुष्य खर्ची पडते. विद्यापीठातून सेवानिवृत्त होत असलेले कर्मचारी देखील असेच आपले अर्धे आयुष्य देत आले आहेत व त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांचे सुध्दा विद्यापीठाच्या वाटचालीत निश्चितच योगदान आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा विभागाचे सहा. कुलसचिव श्री मिलींद देशपांडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे सहसचिव श्री प्रेम मंडपे, सत्कारमूर्ती श्री सतिश गिरपुंजे, सौ. गिरपुंजे, श्री गौतम सिरसाट, सौ. सिरसाट, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

पुढे बोलतांना कुलगुरू म्हणाले, प्रत्येक कर्मचारी आपल्या घरांप्रमाणे समर्पणाची भावना ठेवून विद्यापीठाला सेवा देत आहेत. मनुष्यबळाची समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू असून, बाह्य यंत्रणेव्दारे देखील मनुष्यबळाची समस्या सोडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि त्याची प्रक्रिया देखील सुरू आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री एस.एम. गिरपुंजे, श्री जी.बी. सिरसाट यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. गिरपुंजे व सौ. सिरसाट यांचा सौ. मंजुषा देशमुख यांनी साडी–चोळी, कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. मनिषा कोडापे म्हणाल्या, विद्यापीठाचा प्रत्येक कर्मचारी नि:स्वार्थपणे सेवा देत आहे, हा त्यांच्या सेवेचा गौरव आहे. कुलगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली जनसंपर्क विभागाने सोशल मिडिया सुरू केल्यामुळे विद्यापीठाचे जनमानसांमध्ये नाव होत आहे, असे सांगून त्यांनी दोन्ही सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्या.

यावेळी सत्कारमूर्ती श्री एस.एम. गिरपुंजे, श्री जी.बी. सिरसाट यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा–यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. श्री मिलींद देशपांडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे सहासचिव श्री प्रेम मंडपे यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश


व्य.प.सदस्य डॉ. मनिषा कोडापे विचार व्यक्त करतांना

एडले व मानद सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार जनसंपर्क विभागातील श्री सुनिल महल्ले यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे यांच्यासह विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

सेवानिवृत्त कर्मचारी श्री एस.एम. गिरपूंजे व श्री गौतम सिरसाट यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते









- जयंती विशेष -

# विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रात श्रीचक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

बाराव्या शतकातील तत्वज्ञ व समाजसुधारक तसेच महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यापीठाच्यावतीने श्रीचक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन अभिवादन केले. अभिवादन कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, डॉ. नितीन चांगोले, मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री अमोल ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, श्री सुभाष पावडे, श्री अशोक धाबे, ॲड. अरुण ठाकरे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व श्रीचक्रधर स्वामी यांच्याबद्दल माहिती डॉ. महंत सोनपेठकर यांनी दिली.



## विद्यापीठात क्रांतीसिंह नाना पाटील जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात थोर सेनानी क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला जनसंपर्क विभागातील कर्मचारी उपस्थित होते. संचालन व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## विद्यापीठात
## माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिन म्हणून साजरी
## कुलगुरूंनी उपस्थितांना दिली सद्भावना दिनाची प्रतिज्ञा




भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिन म्हणून विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठाच्यावतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन अभिवादन केले व उपस्थितांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली. जयंती कार्यक्रमाला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव श्री अनिल मेश्राम, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

...ाच आपला
मातृभूमि

# आव्हानात्मक परिस्थितीतही विद्यापीठासाठी कर्मचारी कुटुंबियांसारखे राबतात







प्रतिनिधी /३१ जुलै

अमरावती - कर्मचारी सेवानिवृत्त होत असतांना त्यांच्या कार्याचा सत्कार करणे हे माझे महत्वाचे कार्य मी समजतो. विद्यापीठाचा आज जो देशभरात नावलौकीक आहे, तो कर्मचा-यांमुळेच. आव्हानात्मक परिस्थितीतही विद्यापीठातील कर्मचारी आपल्या कुटुंबासारखे येथे राबतात. यापुढेही असेच कार्य करीत राहावे, जेणेकरुन विद्यापीठाचा नावलौकीक आणखी वाढेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सांख्यिकीशास्त्र विभागप्रमुख तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. राजेश सिंह, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव अनिल काळबांडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री गजानन पंचवटे, सौ. पंचवटे, श्री प्रकाश शिंदे, सौ. शिंदे, श्री अशोक राऊत, सौ. राऊत, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, सत्कारमूर्तींच्या प्रेमापोटी आज सभागृह तुडूंब भरले आहे. श्रुतलेखनाचे विविध सभांचे इतिवृत्त अचुकपणे तयार करण्याचे अतिशय महत्वाचं काम श्री गजानन पंचवटे यांनी पार पाडले आहे. परीक्षा विभागाचे कठीण कार्य कर्मचारी सुरळीतपणे पार पाडत आहेत, ही मोठी उपलब्धी आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री गजानन पंचवटे, श्री प्रकाश शिंदे व श्री अशोक राऊत यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. पंचवटे यांचा सहा. कुलसचिव सौ. साक्षी ठाकुर, सौ. शिंदे व सौ. राऊत यांचा उपकुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला. प्रमुख अतिथी डॉ. राजेश सिंह म्हणाले, विद्यापीठाचे कर्मचारी कुटुंबाप्रमाणे आणि निष्ठेने कामे करतात. एका लहानशा रोपटएाचे वटवृक्षामध्ये रुपांतर करण्यात कर्मचा-यांचा मोठा वाटा आहे. संस्था चालवायला ज्या बाबी लागतात, त्या विद्यापीठाच्या कर्मचा-यांमध्ये आहेत, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्या.

यावेळी सत्कारमूर्ती श्री गजानन पंचवटे, श्री प्रकाश शिंदे व श्री अशोक राऊत यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेले प्रेम, स्नेहभाव व सहकार्यामुळेच आम्हाला चांगली सेवा विद्यापीठाला देता आली. त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तर नियंत्रण अधिकारी श्री मंगेश वरखेडे, श्री अनिल काळबांडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले व मानद सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्ती श्री गजानन पंचवटे, श्री प्रकाश शिंदे व श्री अशोक राऊत यांचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला माजी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी तसेच विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीचे सदस्य, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी

# विद्यापीठाच्या रिसर्च इन्क्युबेशन फाउंडेशन अन् बायोटेक्नॉलॉजी विभागात सहकार्यात्मक करार

## नवोपक्रम, उद्योजकता व संशोधनाच्या व्यवसायिकरणासाठी मजबूत व्यासपीठ

प्रतिनिधी | अमरावती

नवोपक्रम, उद्योजकता व संशोधनाच्या व्यवसायिकरणासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशन आणि बायोटेक्नॉलॉजी विभागामध्ये सहकार्यात्मक करार करण्यात आला आहे. या भागीदारीमुळे जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील नवोपक्रम, उद्योजकता आणि संशोधनाच्या व्यवसायीकरणाच्या दृष्टीने एक मजबूत व्यासपीठ निर्माण होणार आहे.

या सहकार्यात्मक करारामुळे स्टार्टअप्सना आता बायोटेक्नॉलॉजी विभागातील अत्याधुनिक प्रयोगशाळा तसेच पायाभूत सुविधांचा वापर करता येणार आहे. तसेच जैव तंत्रज्ञानाचे विद्यार्थी आणि संशोधकांना स्टार्टअप कल्पना, प्रोटोटाइप आणि व्यवसाय मॉडेल विकासासाठी मार्गदर्शन मिळेल. एवढेच नव्हे, तर तांत्रिक आणि उद्योजकता केंद्रित कार्यक्रम, क्षमता निर्मिती कार्यशाळा आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण सत्रांना प्रोत्साहन मिळणार आहे. इको सिस्टिमच्या मदतीने जैवतंत्रज्ञान संशोधन बाजारपेठ तयार उपायांमध्ये रूपांतर करण्यासाठी एकत्रित प्रयत्न, जैवतंत्रज्ञान स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन, जैवतंत्रशास्त्र क्षेत्रातील विद्यार्थी आणि संशोधकांमध्ये नवोपक्रम, चिकित्सक विचार आणि उद्योजकतेची संस्कृती रुजवण्यास मदत होईल.



रिसर्च इन्क्युबेशन फाउंडेशन-बायोटेक्नॉलॉजी विभागात कराराप्रसंगी उपस्थित मान्यवर.

विद्यापीठाचे कुलगुरू तथा रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मिलिंद बारहाते यांचे नेतृत्व, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे मार्गदर्शन आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचे सकारात्मक प्रशासकीय पाठबळ तसेच न. न. सा. संचालक डॉ. अजय लाड, सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव यांच्या प्रयत्नांमुळे हे यश साध्य करता आले, अशी भावना बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर यांनी व्यक्त केली. या सहकार्य कराराच्या माध्यमातून डीबीटी, भारत सरकारच्या अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगार यासाठी जैवतंत्रज्ञान धोरणाचे एक बायोमॅन्युफॅक्चरिंग आणि बायोफाउंड्री उपक्रम व उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने उदयोन्मुख बायोटेक्नॉलॉजी संशोधकांना सक्षम करण्यास फार मोठी मदत होईल.

पुण्यनगरी

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे विद्यार्थ्यांना आवाहन | विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता प्रशिक्षण शिबिर

# नोकरी मागण्यापेक्षा देण्याचा जगाचा मंत्र शिका

पुण्य नगरी / प्रतिनिधी

अमरावती : आजघडीला आपल्या देशात मोठमोठ्या संधी उपलब्ध आहेत. केंद्र सरकारनेसुद्धा अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्य घडविता येईल. नवनवी संकल्पना अंमलात आणा. जगाने जो नोकरी मागण्यापेक्षा देण्याचा मंत्र स्वीकारला आहे, तो मंत्र शिका व मोठे उद्योजक बना, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांकरिता आयोजित उद्योजकता प्रशिक्षण शिबिरप्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून नागपूरचे डॉ. विवेक नानोटी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य



मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, इन्क्युबेशन फाउंडेशनच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. विवेक नानोटी म्हणाले, आपण जगातील देशांकडे पाहून तेथील विकासाबद्दल बोलत असतो. परंतु, आपणही जगाकडे पाहून पुढे जाण्यासाठी धडपडत राहिले पाहिजे. नावीन्यपूर्णता ही जगाने आत्मसात केली आहे व म्हणूनच आपण बलाढ्य देशांच्या विकासाकडे पाहून बोलत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मानसिकता बदलणे गरजेचे असून नावीन्यपूर्णता आत्मसात करावी, असे ते म्हणाले.

संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी प्रशिक्षण शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी केले. प्रशिक्षण शिबिराला विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

नवराष्ट्र

प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे आवाहन; विद्यापीठात अँण्टी रॅगिंग सप्ताह

# विद्यार्थ्यांनी मैत्रीपूर्ण वातावरण जपावे

अमरावती, ब्युरो. शिक्षण घेत असताना आपल्यासमोर भविष्य असते, स्वप्न असते व ते पूर्ण करण्यासाठीच आपण शिक्षण घेत असतो. मात्र शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताल मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण केले पाहिजे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यार्थ्यांना केले.

अमरावती संत गाडगे बाबा विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मंगळवारी (दि. 12) 'राष्ट्रीय अँण्टी रॅगिंग डे' व सप्ताहाचा शुभारंभ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते झाला. त्याप्रसंगी अध्यक्षीय विचार व्यक्त करताना ते बोलत होते. व्यासपीठावर अँण्टी रॅगिंग स्कॉडचे अध्यक्ष डॉ. प्रणव कोलते, नोडल ऑफिसर डॉ. प्रशांत ठाकरे, स्कॉडच्या सदस्य डॉ. कल्पना जावळे उपस्थित होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ढोरे पुढे म्हणाले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मी सुध्दा विद्यार्थी होतो. त्याही वेळी विद्यापीठ कॅम्पसमध्ये कधीही रॅगिंगचा प्रकार घडला नाही आणि आताही नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुढेही असेच वातावरण निर्माण करावे. आयुष्याची शिदोरी म्हणजे शिक्षण असते. आपले व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांनी घडवावे. सप्ताहभर होणार्या



## रॅगिंग कारवाईबाबत विद्यार्थ्यांना केले अवगत

अँण्टी रॅगिंग स्कॉडचे नोडल ऑफिसर डॉ. प्रशांत ठाकरे यांनी अँण्टी रॅगिंग सप्ताह आयोजनामागील भूमिका मांडताना महाराष्ट्रात काही ठिकाणी झालेल्या रॅगिंगचे प्रकार व त्यानंतर झालेल्या कारवाईबाबत विद्यार्थ्यांना अवगत केले.

कार्यशाळेमध्ये सहभागी होवून त्यातून माहिती घ्यावी व त्याचे अनुकरण करावे. तसेच सिनियर विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्टुडंट इंडेक्स प्रोग्रामनुसार आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. प्रास्ताविकातून डॉ. प्रणव कोलते यांनी अँण्टी रॅगिंग डे व सप्ताहाच्या आयोजनाचे महत्व विशद केले.

हिंदुस्थान

# आदिवासी संशोधन केंद्राच्या विभाग प्रमुखपदी डॉ. मनीषा कोडापे यांची कुलगुरू मार्फत नियुक्ती

(सागर सवळे)

चांदूरबाजार दि. १४ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे अभ्यासक्रमासोबतच विविध नाविन्यपूर्ण अध्याधन केंद्र यशस्वीरित्या राबविण्याकरिता संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. विद्यापीठात नव्यानेच कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते सर यांनी आदिवासी अध्यसन केंद्राची सुरुवात केली. १७ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार कुलगुरूनी या अध्यसन केंद्राचे विभाग प्रमुखपदी डॉ. मनीषा कोडापें यांची नियुक्ती केली. प्रमुखाची जबाबदारी स्वीकारताना ड़ॉ.मनिषा कोडापे म्हणाल्या की,अमरावती विद्यापीठात नव्याने सुरू झालेल्या आदिवासी अध्ययन केंद्राची उद्दिष्ट विद्यापीठातील पाचही जिल्ह्यातील मानववंश शास्त्र अभ्यास, संस्कृती व जीवनशैली जतन, उपजीविका अभ्यास व आर्थिक सक्षमीकरण, आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च व तंत्र शिक्षणात प्रमाण वाढविणे, त्यांच्या दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करणे रोजगार उपलब्ध करून देणे, मार्गदर्शन करणे. याच सोबत मौखिक इतिहास लिपीबद्ध करून प्रकाशित करणे, हजारो वर्षापासून पारंपारिक आयुर्वेदिक इलाज औषधोपचार यावर संशोधन करून प्रकाशित करणे. शासनाच्या विविध विभागाकडून राबवल्या जाणाऱ्या आदिवासी विकासाच्या योजना व कार्यक्रमांचे मूल्यमापन, मूल्यांकन करणे आणि त्यासंबंधी धोरणात्मक शिफारसी करण्याची कारवाई संबंधित विभागाच्या निर्देशाप्रमाणे सदर अध्यासन केंद्रामार्फत करण्यात येईल. केंद्रासाठी सदर अध्ययन केंद्रासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, कौशल्य विकास व उद्योजक्ता विभाग, जिल्हा नियोजन समिती इतर विभागाच्या सध्याच्या योजना नुसार प्रकल्प आधारित पद्धतीने नीधी प्राप्त झाल्यावर अध्यासन केंद्रातून कारवाई करण्यात येईल. विद्यमान कुलगुरूंनी आदिवासी अध्ययन विभागाची जबाबदारी सोपवितांना विश्वास व्यक्त करताना म्हटले की डॉ. मनीषा कोडापे निश्चितच या विभागाला न्याय मिळवून देतील व विभागामार्फत अमरावती विद्यापीठाचे नाव देश पातळीवर पुढे आणतील. यापूर्वी त्यांनी अनेक जबाबदाऱ्या स्वीकारून त्या पूर्णत्वास नेल्या असल्यामुळे त्यांच्यावर ही जबाबदारी मोठ्या विश्वासाने देण्यात येत आहे.



त्यांचे नियुक्ती बद्दल कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते, प्र -कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक दिव्य मराठी

वेध • 'एनईपी उपलब्धी, आव्हाने व भविष्यवेध' कार्यशाळेत डॉ.आवलगांवकर यांचे मत

# सामाजिक स्थिती बदलण्यासाठी शैक्षणिक दृष्टीकोन आवश्यक

प्रतिनिधी | अमरावती

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भाषांना स्थान दिल्या गेले आहे. शिकण्याचे स्वातंत्र्य नवीन शैक्षणिक धोरण देते. आव्हाने तर अनेक आहेत, पण ते पेलवता आली पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळकटी देण्याचा प्रयत्न नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून झाला आहे. म्हणूनच सामाजिक स्थिती बदलण्यासाठी शैक्षणिक दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगांवकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय चिंतन-मंथन कार्यशाळेमध्ये बीजभाषण करताना ते बोलत होते.

व्यासपीठावर कार्यशाळेचे उद्घाटक कुलगुरू मिलिंद बारहाते, राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या अध्यक्ष डॉ. मीनल भोंडे, प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.



मार्गदर्शन करताना डॉ. आवलगांवकर

केशव तुपे, अ.भा. राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे अमरावती विभाग महामंत्री डॉ. मंगेश अडगोकर, विद्यापीठाच्या आय.क्यू.ए.सी.चे संचालक डॉ. संदीप वाघुळे उपस्थित होते.

पुढे डॉ. आवलगांवकर म्हणाले की, ब्रिटीश कालीन शैक्षणिक पद्धत वेगळी होती. कामासाठी माणसे तयार करण्याची ब्रिटिशांची पद्धत होती. देशात मात्र तसे नाही. भारताच्या प्राचीन शिक्षण पद्धतीत ज्ञानार्जन हा शिक्षणाचा मुख्य उद्देश होता. नवीन शैक्षणिक धोरण भाषिक स्वातंत्र्य देते, त्यामुळे त्याचा उपयोग घ्यावा. भविष्याचा वेध घेत असताना वर्तमानाचा विचार करणे आवश्यक आहे. सर्वच क्षेत्रात संशोधनासाठी प्रयत्न करण्याची आज गरज आहे. मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा विचार नवीन शैक्षणिक धोरणामध्ये केला गेला आहे. प्रत्येक जण आत्मनिर्भर झाला, तर देश आत्मनिर्भर होण्यास वेळ लागणार नाही, असेही डॉ. आवलगांवकर म्हणाले.

तसेच मनोगत व्यक्त करताना विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कार्य करणाऱ्यांच्या पाठीशी शासन आहेच, असे सांगून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समाज, पालक, विद्यार्थ्यांमध्ये रूजवावे लागेल, असेही ते म्हणाले. तत्पूर्वी, संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून डॉ. मंगेश अडगोकर यांनी भूमिका मांडली. संचालन डॉ. प्रमोद गारोडे तर आभार ओमप्रकाश मुंदे यांनी मानले.

## विद्यापीठाकडून अडचणी सोडवण्यावर भर

### विकसित भारताकरिता सर्वांचा हातभार लागेल

भारतीय ज्ञान परंपरेचा सुद्धा नवीन शैक्षणिक धोरणांत विचार करण्यात आला आहे. शैक्षणिक क्षेत्रात अनेक आव्हाने आहेत. मात्र, त्यावर मात करण्याचा प्रयत्न देखील विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. भविष्याचा वेध घेत असताना सद्यस्थितीत ज्या अडचणी आहेत. त्यांचा विचार निश्चित केला जाईल. विकसित भारत २०४६ करिता सर्वांचा हातभार लागेल, असेही कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले.

### कौशल्याधिष्ठीत शिक्षणावर भर

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, मातृभाषेतून शिक्षण हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उद्देश आहे. कौशल्याधिष्ठीत शिक्षणावर नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भर देण्यात आला आहे. त्यातही त्या-त्या प्रांतात स्थानिक कौशल्याला अधिक महत्व देण्यात आले आहे. सर्वसमावेशक, न्याय्यपूर्वक आणि दर्जेदार शिक्षण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधून अधोरेखित केल्या आहेत.

नवभारत

# चक्रधरस्वामी हैं ईश्वरीय अवतार : डहाके

## संगाबा अमरावती विवि में व्याख्यान

■ अमरावती, ब्यूरो. समाज में जाकर लोगों से संवाद साधते हुए जनजागृति करने वाले चक्रधरस्वामी ईश्वरी अवतार थे. उक्त प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यकार और अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन के पूर्व अध्यक्ष प्रो. वसंत आबाजी डहाके ने किया. संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के महानुभाव अध्ययन केंद्र की ओर से चक्रधरस्वामी अवतार दिन के उपलक्ष्य में आयोजित श्रीचक्रधरस्वामी और लीलाचरित्र विषय पर आयोजित व्याख्यान में वे बोल रहे थे. अध्यक्षता प्र-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने की. प्रमुख अतिथि के रूप में प्रसिद्ध कवयित्री व समीक्षक डॉ. प्रभा गणोरकर, शिवाजी शिक्षा संस्थान के पूर्व सचिव डॉ. अशोकराव राऊत तथा अध्ययन केंद्र के प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर उपस्थित थे. प्रो. डहाके ने कहा कि गुजरात से आने के बाद चक्रधरस्वामी ने गोविंदप्रभु से भेंट की और यहीं से उनका आध्यात्मिक प्रवास शुरू हुआ. लीलाचरित्र किस प्रकार लिखा गया, उसका उत्तरार्ध-पूर्वार्ध-अनुक्रम, साथ ही चक्रधरस्वामी का महाराष्ट्रभर भ्रमण, लोकसंवाद और 'उत्तरापंथी गमन' पर



उन्होंने अध्ययनपूर्ण प्रकाश डाला. मार्तंडभट्ट को लीलाचरित्र कंठस्थ था और उनके माध्यम से यह वाङ्मय समाज तक पहुंचा. उन्होंने कहा कि महानुभाव वाङ्मय मराठी भाषा का गौरव है और इसका व्यापक अध्ययन होना चाहिए. डॉ. प्रभा गणोरकर ने कहा कि महानुभाव दर्शन विलक्षण है और गोविंदप्रभु एक अद्वितीय व्यक्तित्व थे. अध्यक्षीय भाषण में प्र-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने कहा कि जिनका केवल नाम सुना था, उन्हें प्रत्यक्ष देखकर और उनके विचार सुनना एक बड़ा सौभाग्य है. प्रो. डहाके द्वारा व्याख्यान में प्रस्तुत दृष्टांत और उस समय की परिस्थितियाँ सुनकर मन तृप्त हो गया. कार्यक्रम की शुरुआत चक्रधरस्वामी की प्रतिमा के पूजन, पुष्पार्पण और दीपप्रज्वलन से हुई. प्रास्ताविक डॉ. महंत सोनपेठकर, संचालन डॉ. संदीप जुनघरे तथा आभार प्रा. संदीप तडस ने माना. इस अवसर पर विश्वविद्यालय की प्रबंध परिषद के सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, अमरावती शहर व परिसर के महानुभाव पंथीय महिला-पुरुष और मान्यवर नागरिक बड़ी संख्या में उपस्थित थे.

देशोन्नती

# श्री चक्रधर स्वामी ईश्वरीय अवतार

प्रा. वसंत आबाजी डहाके यांचे प्रतिपादन ▪ विद्यापीठात 'श्री चक्रधरस्वामी व लीळाचरित्र' विषयावर व्याख्यान





**देशोन्नती वृत्तसंकलन**

**अमरावती :** समाजात जावून लोकांशी संवाद साधत जनजागृती करणारे श्री चक्रधर स्वामी ईश्वरीय अवतार आहेत, अशा आशयाचे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राच्या वतीने श्री चक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त आयोजित 'श्री चक्रधरस्वामी व लीळाचरित्र' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून प्रसिध्द कवयित्री व समीक्षक डॉ. प्रभाताई गणोरकर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. अशोक राऊत, अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा. वसंत आबाजी डहाके म्हणाले की, गुजरात येथून आल्यानंतर श्री चक्रधरस्वामींनी गोविंदप्रभूंची भेट घेतली आणि तेथेच त्यांचा अनुग्रह झाला. लीळाचरित्राची पार्श्वभूमी सांगताना प्रा. डहाके यांनी लीळाचरित्र कशाप्रकारे लिहिल्या गेले, चक्रधरस्वामींचे महाराष्ट्रभर भ्रमण, लोकांशी संवाद, उत्तरापंथी गमन अर्थात लोकांपासून दूर जाणे आदी बाबींवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. लीळाचरित्र लिहिताना त्यांचा आधी उत्तरार्ध नंतर पूर्वार्ध आणि शेवटी एकांक लिहिल्या गेल्याचे ते म्हणाले. माईंमभट्ट यांना लीळाचरित्र संपूर्ण पाठ होते व त्यानंतर ते लिहिल्या जावून जनतेपर्यंत कसे पोहचले, यावरही प्रा. डहाके यांनी प्रकाश टाकला. महानुभाव वाङ्‌मय मराठी भाषेचं वैभव असून त्याचा अभ्यास व्हावा, असे आवाहनदेखील त्यांनी याप्रसंगी केले.

प्रमुख अतिथी डॉ. प्रभाताई गणोरकर म्हणाल्या, महानुभाव तत्त्वज्ञान विलक्षण असून, गोविंदप्रभू एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. लीळा चरित्रातील अनेक प्रसंग सांगताना डॉ. गणोरकर यांनी अनेक दृष्टांतदेखील विशद केले. गोविंद प्रभूंकडून श्री चक्रधरस्वामींना स्थैर्य कसे मिळाले, याचाही एक प्रसंग त्यांनी यावेळी उपस्थितांना सांगितला.

अध्यक्षीय भाषणातून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, ज्यांचे नाव फक्त ऐकले होते, त्यांना प्रत्यक्ष पाहून त्यांचे विचार ऐकता आले हे आपले भाग्य आहे. विषयाची मांडणीदेखील प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी मुद्देसुदपणे केली. त्याकाळची परिस्थिती, दृष्टांत व्याख्यातांनी सांगितले, ते ऐकून मन तृप्त झाल्याचेही प्र-कुलगुरू म्हणाले.

श्री चक्रधर स्वामींच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी, तर आभार प्रा. संदीप तडस यांनी मानले.

कार्यक्रमाला विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांच्यासह अमरावती शहर तसेच शहराबाहेरील महानुभाव पंथीय महिला, पुरुष, गणमान्य नागरिक उपस्थित होते.

मराठी दैनिक वृत्त केसरी

▪ प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबराव महाराजांनी

# विविध ज्ञान क्षेत्रामध्ये दिलेले योगदान अतुलनीय




**प्रतिनिधी / वृत्त केसरी**

**अमरावती, २५ ऑगस्ट:** संत गुलाबराव महाराजांनी साहित्य, तत्वज्ञान, संगीत, वैद्यकीय आदी ज्ञान क्षेत्रामध्ये सांगितलेले ज्ञान व त्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचं प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते डॉ. अरविंद देशमुख यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू श्री संत

## संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला

गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात संपन्न झाली, त्याप्रसंगी 'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज यांचे विविध ज्ञानक्षेत्रातील योगदान' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून व्याख्यान देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, ब्राजलाल बियाणी शिक्षा समिती, अमरावतीचे अध्यक्ष ओमप्रकाशजी लड्ढा, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य डॉ. दिपक धोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. डॉ. देशमुख पुढे म्हणाले, महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. संत परंपरा महाराष्ट्राचा प्राण आहे आणि प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे संत परंपरेतील एक संत आहे. या संत परंपरेत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते आजपर्यंतच्या विविध संतांनी समाजकल्याणासाठी योगदान दिलेले आहे. संत गुलाबराव महाराजांनी संस्कृत भाषेसह विविध भाषेमध्ये विपुल ग्रंथसंपदा समाजाला उपलब्ध करुन दिली आहे. भारतीय संस्कृतीचे दर्शन त्यांच्या साहित्यातून होते. भारत मातेला डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी आपले कार्य केले आहे. भारतीय वैदिक संस्कृती महान असल्याचे ठासून सांगणारे संत गुलाबराव महाराज सर्वश्रेष्ठ आहे, असे ते म्हणाले.

### संत परंपरेचा अभिमान बाळगा – कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली आहे. अमरावती जिल्हामध्ये अनेक महान संत होऊन गेले. या संतांच्या तत्वज्ञानाचा, कार्यांचा व शिकवणूकीचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, यासाठी अशाप्रकारच्या व्याख्यानाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. डॉ. अरविंद देशमुख यांनी विषयाच्या अनुषंगाने गुलाबराव महाराजांच्या विविध ज्ञान क्षेत्रातील योगदानावर सविस्तर विवेचन केले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. दिपक धोटे, तर प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. संचालन व आभार डॉ. सुरुची कडू यांनी केले. कार्यक्रमाला अॅड. अशोक राठी, रविंद्र इंगोले, पंडीत मोहोड, मोरेभर मोहोड, अरुण इंगोले, व्ही.के. खांडे, डॉ. श्रीकांत पाटील आदी उपस्थित होते.

दिव्य मराठी, अमरावती, शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ | २

मंथन • विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरच्या राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये मान्यवरांचा सूर

# लैंगिक समानता, महिला सक्षमीकरणासाठी न्यायप्रणाली महत्त्वाची : डॉ. पंकज उंबरकर

प्रतिनिधी | अमरावती

लैंगिक समानता अन् महिला सक्षमीकरणासाठी न्यायप्रणाली उपयुक्त असल्याचे मत रायपूरच्या हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतील डॉ. पंकज उंबरकर यांनी 'जेंडर इक्विटी ॲण्ड वुमेन एम्पॉवरमेंट' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात बोलताना न्यायव्यवस्थेत लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बदलांवर प्रकाश टाकून महिलांच्या न्यायप्रवेशातील समस्या आणि त्यावरील उपाय यावर त्यांनी सविस्तर विवेचन केले. त्यांनी ऐतिहासिक खटले, न्यायालयीन निर्णय आणि वर्तमानातील प्रकरणांचा संदर्भ देत लैंगिक समानतेसाठी न्यायव्यवस्थेच्या भूमिकेची महत्त्वपूर्णता स्पष्ट केली. न्यायदान केवळ कायदेशीर प्रक्रियापुरते मर्यादित न राहता ते सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून असले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. यांसदर्भात भारतीय संविधानाचे महत्त्व व वैशिष्ट्ये त्यांनी अधोरेखित केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा पीएम-उषा अंतर्गत 'जेंडर इक्विटी अँड वुमेन एम्पॉवरमेंट' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राला अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तर उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे उपस्थित होत्या. त्यांसह वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे आणि सहसमन्वयक डॉ. वैशाली धनविजय उपस्थित होत्या.




राष्ट्रीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. पंकज उंबरकर व उपस्थित मान्यवर.

## संस्कृती अन् स्त्रिया विषयावरही कार्यशाळेत झाली चर्चा

कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात अमरावतीतील भारतीय महाविद्यालय येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. दया पांडे यांनी विषयतज्ज्ञ म्हणून सहभागींशी चर्चा केली. या सत्रात जेंडर इक्विटी अँड वुमेन एम्पॉवरमेंट संदर्भात सहभागींनी काही प्रश्न विचारले, काही आपले मते मांडली. हे सत्र संवादात्मक होते. ज्यामध्ये स्त्रियांविरुद्ध हिंसाचार, समानता, स्त्रियांचे माध्यमांमधील सादरीकरण, संस्कृती आणि स्त्रिया अशा अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर या वेळी मान्यवरांची चर्चा घडून आली. यामध्ये अनेकांचा सहभाग होता.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात छत्तीसगड राज्यातील रायपूर येथील हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीमधीलच डॉ. प्रियंका मोहोड यांनी 'वुमेन एम्पॉवरमेंट ॲण्ड लॉ' या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी महिला सक्षमीकरणाची संकल्पना स्पष्ट करुन कायद्याद्वारे महिलांचे सक्षमीकरण करण्यासंदर्भात आपल्या मांडणीद्वारे चर्चा केली. स्त्रियांसाठी अस्तित्वात असणारे कायदे, त्यांमागील पार्श्वभूमी स्पष्ट करुन त्यांनी आवश्यक बदलांविषयी चर्चा केली. पहिल्या व दुसऱ्या सत्रांमध्ये विषयतज्ज्ञांनी सहभागींसोबत संवादात्मक चर्चा केली. तसेच विविध कृतींच्याद्वारे विषय विवेचन केले. काही महत्त्वाचे माहितीपट दाखवून त्यावर चर्चा केली.

कार्यशाळेच्या समारोप सत्राला अध्यक्ष म्हणून वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रीय कार्यशाळेत दिवसभर झालेल्या मांडणीचा आढावा घेतला. या वेळी अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शारीरिक शिक्षण पदवी महाविद्यालयाच्या प्रा. श्रद्धा द्विवेदी,चांदूर बाजार येथील कै. नारायणराव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालयातील डॉ. विनय वसुले यांनी अभिप्राय दिला. पहिल्या व दुसऱ्या सत्राचे संचालन प्रा. पूजा अलोने यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अभिलाष धाबे यांनी केले. तर समारोप सत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मनीषा इंगळकर यांनी केले.

# समाजातील शेवटच्या घटकाचा विकास हाच पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म विचार





प्रतिनिधी / २८ ऑगस्ट

**अमरावती :** पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार हा अखिल मानवाच्या सुखाचा विचार आहे व तो समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा असा एकात्म विचार आहे, असे मौलिक विचार विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य व कार्यशाळेचे बीजभाषक डॉ. नितीन खर्चे यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, उद्घाटक म्हणून व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.

डॉ. खर्चे म्हणाले, १९६५ मध्ये पं. दीनदयाल उपाध्याय यांची चार दिवस चार भाषणं झाली आणि त्यातून त्यांचा एकात्म मानव दर्शन विचार पुढे आला. अखिल मानवजातीच्या विचाराचे पूर्वीपासूनच आपल्या देशात बीजारोपण झाले. पं. दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार संत साहित्यातही आहे. आपण जे काही करतो, त्यात सुखाचा विचार असतो आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांनीही मानवी सुखाचा विचार आपल्या एकात्म दर्शनातून मांडला. अंत्योदय अर्थात समाजातील शेवटचा घटक म्हणजे कुटुंब असे पं. दीनदयाल मानतात. कुटुंब व्यवस्थेमुळे आपली संस्कृती टिकून आहे. नातीगोती सुध्दा एकात्म भावामुळेच एकमेकांशी पुरक आहेत. एकात्म भावामुळेच आपण एकमेकांच्या मदतीला धावत असतो. त्यामुळे आपण सृष्टीशी एकरुप असले पाहिजे असे पं. दीनदयाल उपाध्याय यांनी म्हटले आहे. व्यष्टी, समेष्टी, सृष्टी आणि परमेष्टी असा विचार पं. दीनदयाल उपाध्याय यांनी दिला. एवढेच नाही, तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा पुरुषार्थातून चांगले आचारविचार, त्यातून अर्थार्जन आणि सुख अशी कल्पना पं. दीनदयाल उपाध्याय यांनी मांडली. सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी यांनी आपापल्या महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार पोहचवावा, असे आवाहन याप्रसंगी डॉ. नितीन खर्चे यांनी उपस्थितांना केले. कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याचे घोषित करुन व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू म्हणाले, शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत त्याच्या सर्वांगीण विकासाच्या सर्व बाबी पोहचल्या पाहिजेत. त्यांना मदत केली पाहिजे. विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार पोहचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संत गाडगे बाबा, पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून डॉ. राजीव बोरकर कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी विविध राज्य, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेवून विद्यापीठाचा नावलौकीक करणारे विद्यार्थी चेतन खापरे, शिवम शर्मा, प्रथमेश अडायणे, क्रिश आत्राम, प्रगती सुधा, मो. अफसर मो. साबीर यांचा तसेच चमू व्यवस्थापक श्री सावन देशमुख, डॉ. नेत्रा मानकर, अभिजित भावे यांचा, विद्यार्थी विकास विभागाने आयोजित केलेल्या घोषवाक्य स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या व्ही.ए. गायकवाड, डॉ. डी.एन. तांबेवार व प्रा. प्रनाली चांदुरकर यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठ विविध प्राधिकारिणींचे सदस्य, विभागाच्या पाचही जिल्हांमधील महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, चमू व्यवस्थापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी

व्याख्यानमाला • बियाणी विज्ञान महाविद्यालय डॉ. अरविंद देशमुख यांचे प्रतिपादन

# संत गुलाबराव महाराजांचे विविध ज्ञान क्षेत्रातील योगदान अतुलनीय





प्रमुख वक्ते डॉ. अरविंद देशमुख मार्गदर्शन करताना, तर दुसऱ्या छायाचित्रात सभागृहात व्याख्यानमालेला उपस्थित प्रेक्षक.

प्रतिनिधी | अमरावती

संत गुलाबराव महाराजांनी साहित्य, तत्वज्ञान, संगीत, वैद्यकीय आदी ज्ञान क्षेत्रामध्ये सांगितलेले ज्ञान व त्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते डॉ. अरविंद देशमुख यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात घेण्यात आली, त्याप्रसंगी प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांचे विविध ज्ञान क्षेत्रातील योगदान या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. देशमुख बोलत होते.

अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, ब्रिजलाल बियाणी शिक्षा समिती अध्यक्ष ओमप्रकाश लढ्ढा, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य डॉ. दीपक धोटे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

डॉ. देशमुख म्हणाले, महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. संत परंपरा महाराष्ट्राचा प्राण आहे आणि प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे संत परंपरेतील एक संत आहेत. या संत परंपरेत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते आजपर्यंतच्या विविध संतांनी समाज कल्याणासाठी योगदान दिलेले आहे. संत गुलाबराव महाराजांनी संस्कृत भाषेसह विविध भाषेत विपुल ग्रंथसंपदा समाजाला उपलब्ध करून दिली आहे.

भक्ती कशी असावी, तर महाराजांनी भक्तीचा संबंध मनाशी लावला. गुलाबराव महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर डॉ. देशमुख यांनी व्याख्यानातून प्रकाश टाकला. गुलाबराव महाराजांचे विचार प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात करून आपली बौद्धिक व सांस्कृतिक पातळी उंचावली पाहिजे, त्यातूनच सुसंस्कृत विद्यार्थी घडू शकेल.

स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. दीपक धोटे, तर प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. सूत्रसंचालन करून डॉ. सुरुची कडू यांनी आभार मानले. कार्यक्रमाला बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक राठी, संत गुलाबराव महाराज भक्तिधामचे अध्यक्ष रवींद्र इंगोले, संरक्षक पंडित मोहोड, मोरेश्वर मोहोड, अरुण इंगोले, व्ही. के. खांडे, डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

## संत परंपरेचा अभिमान बाळगा : कुलगुरू डॉ. बारहाते

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली आहे. अमरावती जिल्ह्यात अनेक महान संत होऊन गेले. या संतांच्या तत्वज्ञानाचा, कार्याचा व शिकवणुकीचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, यासाठी अशा प्रकारच्या व्याख्यानाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. आज विद्यार्थ्यांची सहनशक्ती कमी झाली आहे. तरुण वर्ग मोबाइल तसेच ड्रग्सच्या आहारी जात आहे. समाजासमोर अनेक समस्या व आव्हाने आहेत. हे जरी असले, तरी विद्यार्थ्यांनी वर्गात न जाणे, गुन्हेगारी व व्यसनाधीन आदी बाबींकडे वळणे, या गोष्टींकडे पालकांनी लक्ष देण्याची गरज आहे. तरुणांना योग्य दिशा देण्याची गरज आहे. त्यांना संत विचारातून निश्चितच दिशा मिळू शकेल.

# लैंगिक समानता, महिला सक्षमीकरणासाठी न्यायप्रणालीची उपयुक्तता

विद्यापीठातील राष्ट्रीय कार्यशाळेतील चर्चेचा सूर

वूमेन्स स्टडीज सेंटरद्वारे आयोजन

पुण्य नगरी / प्रतिनिधी



अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वूमेन्स स्टडीज सेंटरद्वारा पीएम-उषा अंतर्गत 'जेंडर इक्विटी अँण्ड वूमेन एम्पॉवरमेंट' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राला अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उद्घाटक म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे तर प्रमुख अतिथी म्हणून वूमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे आणि सहसमन्वयक डॉ. वैशाली धनविजय उपस्थित होत्या. या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात छत्तीसगड राज्यातील रायपूर येथील हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतील डॉ. पंकज उंबरकर यांनी 'जेंडर इक्विटी अँण्ड दि जुडिशियल सिस्टम' या विषयावर मांडणी केली. दुसऱ्या सत्रात डॉ. प्रियंका मोहोड यांनी 'वूमेन एम्पॉवरमेंट अँण्ड लॉ' या विषयावर मार्गदर्शन केले. पहिल्या व दुसऱ्या सत्रामध्ये विषयतज्ज्ञांनी सहभागींसोबत संवादात्मक चर्चा केली. तसेच विविध कृतींद्वारे विषय विवेचन केले. काही महत्त्वाचे माहितीपट दाखवून त्यावर चर्चा केली. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. दया पांडे यांनी सहभागींशी चर्चा केली. कार्यशाळेच्या समारोप सत्राला अध्यक्ष म्हणून वूमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रीय कार्यशाळेत दिवसभर झालेल्या मांडणीचा आढावा घेतला. कार्यशाळेला मोठ्या संख्येने विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, विविध शासकीय विभागांचे कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पहिल्या व दुसऱ्या सत्राचे संचालन प्रा. पूजा अलोने यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अभिलाष धात्रे यांनी केले. तर समारोप सत्राचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. मनीषा इंगळकर यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी

# विद्यापीठात श्री चक्रधर स्वामींना अभिवादन



संगाबा विद्यापीठात श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर.

**प्रतिनिधी | अमरावती**

बाराव्या शतकातील तत्त्वज्ञ व समाजसुधारक तसेच महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.या वेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यापीठाच्या वतीने श्री चक्रधर स्वामींच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून अभिवादन केले.

या वेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. मेटकर, डॉ. नितीन चांगोले, डॉ. मोना चिमोटे, डॉ. राजीव बोरकर, डॉ. नीलेश कडू, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, डॉ. विलास नांदुरकर, अमोल ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, सुभाष पावडे, अशोक धाबे, ॲड. अरुण ठाकरे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व श्री चक्रधर स्वामींबद्दल माहिती डॉ. महंत सोनपेठकर यांनी दिली.

मातृभूमि

# प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबराव महाराजांनी विविध ज्ञान क्षेत्रामध्ये दिलेले योगदान अतुलनीय

✻ डॉ. अरविंद देशमुख यांचे प्रतिपादन ✻ प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला संपन्न



प्रतिनिधी /२२ ऑगस्ट

अमरावती : संत गुलाबराव महाराजांनी साहित्य, तत्वज्ञान, संगीत, वैद्यकीय आदी ज्ञान क्षेत्रामध्ये सांगितलेले ज्ञान व त्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते डॉ. अरविंद देशमुख यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात संपन्न झाली, त्याप्रसंगी 'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज यांचे विविध ज्ञानक्षेत्रातील योगदान' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून व्याख्यान देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, ब्राजलाल बियाणी शिक्षा समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री ओमप्रकाशजी लड्ढा, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य डॉ. दिपक धोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. देशमुख पुढे म्हणाले, महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. संत परंपरा महाराष्ट्राचा प्राण आहे आणि प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे संत परंपरेतील एक संत आहे. या संत परंपरेत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते आजपर्यंतच्या विविध संतांनी समाजकल्याणासाठी योगदान दिलेले आहे. संत गुलाबराव महाराजांनी संस्कृत भाषेसह विविध भाषेमध्ये विपुल ग्रंथसंपदा समाजाला उपलब्ध करुन दिली आहे. भारतीय संस्कृतीचे दर्शन त्यांच्या साहित्यातून होते. भारत मातेला डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी आपले कार्य केले आहे. भारतीय वैदिक संस्कृती महान असल्याचे ठासून सांगणारे संत गुलाबराव महाराज सर्वश्रेष्ठ आहे.पुढे म्हणाले, ते जागतिक तत्वचिंतक असून शिक्षणातून सुसंस्काराचे दान मिळायला पाहिजे. भौतिक समृद्धी ज्यावेळी वाढेल, त्यावेळी मनुष्याची आत्मशांती कमी होईल आणि म्हणून महाराजांनी आत्मशांतीसाठी भक्तीमार्गाचा उपदेश केला. भक्ती कशी असावो, तर महाराजांनी भक्तीचा संबंध मनाशी लावला. गुलाबराव महाराजांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर डॉ. देशमुख यांनी व्याख्यानातून प्रकाश टाकला. गुलाबराव महाराजांचे विचार प्रत्येक विद्यार्थ्यांनी आत्मसात करुन आपली बौद्धिक व सांस्कृतिक पातळी उंचावली पाहिजे, त्यातूनच सुसंस्कृत विद्यार्थी घडू शकेल. ज्ञानेश्वर माऊलींना गुलाबराव महाराजांनी पूर्ण शरणागती दिली. त्यांनी सांगितले, जिथे श्रद्धा तिथे ईश्वर आहे. सर्वसामान्य माणसांचे कल्याण व्हावे, यासाठी महाराजांनी ग्रंथातून विचार दिले. मराठी साहित्यामध्ये अशाप्रकारचे साहित्य लिहीणारे दुसरे संत होऊन गेले नाही, असे सांगून जगातील सर्व धर्माचे लोकं एकत्र नांदू शकतील, एवढी ताकद गुलाबराव महाराजांच्या साहित्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

सरस्वती वंदन, राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गुलाबराव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. दिपक धोटे, तर प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. संचालन व आभार डॉ. सुरुची कडू यांनी केले. कार्यक्रमाला ब्राजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष अँड. अशोक राठी, श्री संत गुलाबराव महाराज भक्तिधामचे अध्यक्ष श्री रविंद्र इंगोले, संरक्षक श्री पंडीत मोहोड, कोषाध्यक्ष श्री मोरेश्वर मोहोड, श्री अरुण इंगोले, श्री व्ही.के. खांडे, आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, सौ. देशमुख तसेच संत गुलाबराव महाराजांचे भाविक भक्त, नागरिक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदुस्थान

# संतांनीच देशाला संस्कृतीची ओळख करुन दिली : डॉ. स्वप्नील इंगोले

## विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती व्याख्यानमाला

अमरावती दि. २० : संतांनीच देशाला संस्कृतीची ओळख करुन दिली, असे विचार श्रीमती राधादेवी गोयनका महाविद्यालय, अकोला येथील मराठी विभागप्रमुख डॉ. स्वप्नील इंगोले यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित 'मराठी संत परंपरा आणि राष्ट्रसंतांचा मानवतावाद' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, प्रमुख अतिथी म्हणून प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा, जि. वाशिमचे अध्यक्ष श्री सुभाषराव ठाकरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एच. कान्हेरकर, आचार्य हरिभाऊ वेरुळकर उपस्थित होते.



डॉ. इंगोले म्हणाले, संत ज्ञानेश्वरांनी संत परंपरेचा पाया रचला. संतांनी लोकांच्या मनाला हात घालून त्यांना वाट दाखविली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून जीवन जगण्याचा मंत्र दिला. खेडोपाडी राष्ट्रसंतांचे विचार पोहचले. त्यांच्या विचारातून खेडी समृध्द होत आहे. त्यांनी सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली. महिलांचा सन्मान केला. या देशाचे युवक बलीशाल व्हावेत, यासाठी ग्रामगीतेतून विचार व कृती दिली. संत गाडगे बाबा विज्ञानवादी संत होते. संत हे अनुभवाचे सागर आहेत. शामराव दादा मोकदम, ग्रामगीताचार्य तुकारामदादा, सुदाम सावरकर हे संत साहित्याचे पाईक आहेत, असे सांगून व्याख्याते डॉ. इंगोले यांनी संत ज्ञानेश्वरापासून तर संत गाडगे बाबांपर्यंत संत परंपरा उलगडून दाखविली.

प्रमुख अतिथी श्री मधुभाऊ घारड म्हणाले, स्वातंत्र्यासाठी लाखो लोकांनी बलिदान दिले. त्यांच्यामुळेच आपण आज स्वातंत्र उपभोगतो आहोत. राष्ट्रसंतांच्या विचारावर अनेक विद्यापीठांनी संशोधन केले आहे. संत साहित्यावर अनेक संमेलने सुध्दा झालीत. स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रसंत आणि शामरावदादा मोकदम यांचे मोठे योगदान होते, असेही ते म्हणाले.

श्री सुभाषराव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राला, देशाला संतांनी कतृत्वाची झलक मुद्देसुद दाखविली. संतांनी त्या काळात सांगितलेल्या गोष्टींचे आज अनुपालन होत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा हे आमचे दैवत आहेत व त्यांच्या विचारकार्यानेच आम्ही आज कार्य करीत आहोत. शामरावदादा मोकदम यांची स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना साथ होती.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजय लाड म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना आता आवडीचे शिक्षण घेता येते. विद्यापीठाचे सुध्दा कौशल्यधारित शिक्षण देण्याचे धोरण आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थीभिमुख प्रकल्प राबवावेत, जेणेकरुन विद्यार्थी आपले भविष्य घडवू शकतील. विद्यार्थ्यांनी सुध्दा आपल्या मनातील संकल्पना वास्तवात आणाव्यात, असे आवाहन करुन विद्यापीठाच्या अध्यासन केंद्रांना शाळांसोबत जोडण्याचा प्रयत्न विद्यापीठाकडून सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. राष्ट्रसंतांचा मानवतावाद विद्यार्थ्यांनी घरोघरी पोहचवावा, असेही आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व शामरावदादा मोकदम यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.एच. कान्हेरकर यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रमोद देवके, तर आभार डॉ. शरद वाघोळे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ ग्रामीण पुण्य नगरी २

# संत गुलाबराव महाराजांचे विविध ज्ञान क्षेत्रामधील योगदान अतुलनीय

पुण्य नगरी / प्रतिनिधी

## डॉ. अरविंद देशमुख यांचे प्रतिपादन

## प्रज्ञाचक्षु श्रीसंत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला

अमरावती : संत गुलाबराव महाराजांनी साहित्य, तत्वज्ञान, संगीत, वैद्यकीय आदी ज्ञान क्षेत्रामध्ये सांगितलेले ज्ञान व त्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे, असे प्रतिपादन वक्ते डॉ. अरविंद देशमुख यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू श्रीसंत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी 'प्रज्ञाचक्षू श्रीसंत गुलाबराव महाराज यांचे विविध ज्ञानक्षेत्रातील योगदान' या विषयावर ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, ब्रजलाल बियाणी शिक्षा समिती, अमरावतीचे अध्यक्ष ओमप्रकाश लड्ढा, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य डॉ. दीपक धोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनीही





आपले विचार व्यक्त केले. सरस्वती वंदन, राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गुलाबराव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. दीपक धोटे, तर प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी केलें. संचालन व आभार प्रदर्शन डॉ. सुरुची कडू यांनी केले. कार्यक्रमाला ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक राठी, श्रीसंत गुलाबराव महाराज भक्तिधामचे अध्यक्ष रवींद्र इंगोले, संरक्षक पंडित मोहोड, कोषाध्यक्ष मोरेश्वर मोहोड, अरुण इंगोले, व्ही. के. खांडे, आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्यासह संत गुलाबराव महाराजांचे भाविकभक्त, नागरिक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुण भारत

# एकात्म मानव विचार सर्वांच्या सुखाचा : डॉ. नितीन खर्चे

## विद्यापीठात एकात्म मानव दर्शन कार्यशाळा

◆ **अमरावती, २८ ऑगस्ट**

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार हा अखिल मानवाच्या सुखाचा व समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा असा एकात्म विचार आहे, असे मौलिक विचार विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य व कार्यशाळेचे बीजभाषक डॉ. नितीन खर्चे यांनी मांडले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, उदघाटक म्हणून व्य.प. सदस्य डॉ. रवींद्र कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.



मार्गदर्शन करताना डॉ. नितीन खर्चे व उपस्थित मान्यवर

डॉ. खर्चे म्हणाले, १९६५ मध्ये पं. दीनदयाल उपाध्याय यांची चार दिवस चार भाषणे झाली आणि त्यातून त्यांचा एकात्म मानव दर्शन विचार पुढे आला. अखिल मानवजातीच्या विचाराचे पूर्वीपासूनच आपल्या देशात बीजारोपण झाले. पं. दीनदयाल यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार संत साहित्यातही आहे. कुटुंब व्यवस्थेमुळे आपली संस्कृती टिकून आहे. नातीगोती सुध्दा एकात्म भावामुळेच एकमेकांशी पुरक आहेत. एकात्म भावामुळेच आपण एकमेकांच्या मदतीला धावत असतो. त्यामुळे आपण सृष्टीशी एकरुप असले पाहिजे असे पं. दीनदयाल यांनी सांगितले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कुलगुरू डॉ. बारहाते यांचेही भाषण झाले. ◂*(तभा वृत्तसेवा)*

# विवि में मनाई स्व. राजीव गांधी की जयंती



अमरावती, 21 अगस्त - देश के पूर्व प्रधानमंत्री भारतरत्न स्व. राजीव गांधी की जयंती हर वर्ष सद्भावना दिवस के रुप में मनाई जाती है. इस निमित्त संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते द्वारा प्रतिमा पूजन तथा पुष्प अर्पित कर अभिवादन किया गया. साथ ही उपस्थितों को सद्भावना दिवस की प्रतिज्ञा दिलाई गई. कार्यक्रम में प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मुल्यमापन मंडल संचालक डॉ. नितिन कोली, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडल के संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. श्रीकांत पाटिल, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव अनिल मेश्राम, उद्यान अधीक्षक अनिल घोम समेत विवि के अधिकारी व कर्मचारी बड़ी संख्या में उपस्थित थे.

वृत्त केसरी
www.vruttakesari.com ६

### विद्यापीठात एकात्म मानव दर्शन कार्यशाळेचे उद्घाटन

# विकास हाच पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म विचार







प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, २८ ऑगस्टः पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार हा अखिल मानवाच्या सुखाचाविचार आहे व तो समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा असा एकात्म विचार आहे, असे मौलिक विचार विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य व कार्यशाळेचे बीजभाषक डॉ. नितीन खर्चे यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, उद्घाटक म्हणून व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.

डॉ. खर्चे म्हणाले, 1965 मध्ये पं. दीनदयाल उपाध्याय यांची चार दिवस चार भाषणं झाली आणि त्यातून त्यांचा एकात्म मानव दर्शन विचार पुढे आला. अखिल मानवजातीच्या विचाराचे पूर्वीपासूनच आपल्या देशात बीजारोपण झाले. पं. दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शनाचा विचार संत साहित्यातही आहे. आपण जे काही करतो, त्यात सुखाचा विचार असतो आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांनीही मानवी सुखाचा विचार आपल्या एकात्म दर्शनातून मांडला. अंत्योदय अर्थात समाजातील शेवटचा घटक म्हणजे कुटुंब असे पं. दीनदयाल मानतात. कुटुंब व्यवस्थेमुळे आपली संस्कृती टिकून आहे. नातीगोती सुध्दा एकात्म भावामुळेच एकमेकांशी पुरक आहेत. एकात्म भावामुळेच आपण एकमेकांच्या मदतीला धावत असतो. त्यामुळे आपण सृष्टीशी एकरुप असले पाहिजे असे पं. दीनदयाल उपाध्याय यांनी म्हटले आहे. व्यष्टी, समेष्टी, सृष्टी आणि परमेष्टी असा विचार पं. दीनदयाल उपाध्याय यांनी दिला. एवढेच नाही, तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा पुरुषार्थातून चांगले आचारविचार, त्यातून अर्थार्जन आणि सुख अशी कल्पना पं. दीनदयाल उपाध्याय यांनी मांडली. सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी यांनी आपापल्या महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार पोहचवावा, असे आवाहन याप्रसंगी डॉ. नितीन खर्चे यांनी उपस्थितांना केले. कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याचे घोषित करुन व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू म्हणाले, शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत त्याच्या सर्वांगीण विकासाच्या सर्व बाबी पोहचल्या पाहिजेत. त्यांना मदत केली पाहिजे. विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार पोहचेल, असा विभास त्यांनी व्यक्त केला. कार्यशाळेच्या माध्यमातून पं. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल-कुलगुरू अध्यक्षीय विचार मांडतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, पं. दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शनाचा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा, या उदात्त हेतुने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आणि प्रतिसादही उत्स्फूर्तपणे मिळाला. देशाच्या जडणघडणीत अनेक महापुरुषांचा हातभार लागला आहे. त्यात पं. दीनदयाल उपाध्याय यांचा सुध्दा हातभार लागला. तरुणवर्गात त्यांचे विचार पोहचविणे हे आपले कर्तव्य आहे व बीजभाषकांनी सुध्दा अगदी सोप्या भाषेत पं. दीनदयाल उपाध्याय यांचे मौलिक विचार मांडलेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांच्या विचाराशी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या विचाराचे साम्य आहे, असे सांगून सर्व कार्यक्रम अधिकारी यांनीही आपापल्या महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांपर्यंत पं. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार पोहचवावेत, असे आवाहन याप्रसंगी कुलगुरुंनी केले. संत गाडगे बाबा, पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून डॉ. राजीव बोरकर कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी विद्यार्थी चेतन खापरे, शिवम शर्मा, प्रथमेश अडायगे, क्रिश आत्राम, प्रगती सुधा, मो. अफसर मो. साबीर यांचा तसेच चमू व्यवस्थापक सावन देशमुख, डॉ. नेत्रा मानकर, अभिजित भावे यांचा, विद्यार्थी विकास विभागाने आयोजित केलेल्या घोषवाक्य स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या व्ही.ए. गायकवाड, डॉ. डी.एन. लांजेवार व प्रा. प्रणाली चांदुरकर यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले.

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आता 'एईडीपी' अंतर्गत अप्रेंटिसशिप

## पहिल्या टप्प्यात बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) व बी.एस्सी. डेटा सायन्सच्या अभ्यासक्रमांना लागू

पुण्य नगरी / प्रतिनिधी

अमरावती : पदवीच्या विद्यार्थ्यांना शिकतानाच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने 'अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (एईडीपी) या उपक्रमांतर्गत सहा महिन्यांची औद्योगिक शिक्षण (अप्रेंटिसशिप) उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असून, त्याची अंमलबजावणी शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासूनच सुरू झाली आहे.

केंद्र सरकारची स्वायत्त संस्था असलेले बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग, मुंबई आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्यात नुकताच याबाबत एक सामंजस्य करार झाला आहे. या करारामुळे विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एईडीपी ही योजना लागू करण्यात आली आहे.



प्रामुख्याने पहिल्या टप्प्यात बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) व बी.एसस्सी. डेटा सायन्स ॲण्ड ॲनॉलिटिक्स या अभ्यासक्रमांसाठी ही सुविधा असून, भविष्यात गरजेनुसार इतरही अभ्यासक्रमांना ही अप्रेंटिसशिप लागू करण्याचा मानस असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. हे दोन्ही अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू केले असून, या अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्रात विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल अप्रेंटिसशिप पूर्ण करावयाची आहे. या सहा महिन्यांच्या कालावधीत रोजगाराच्या अनेक संधी विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग मुंबईचे साहाय्यक संचालक डॉ. पी.एच. उईके यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्यात. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड उपस्थित होते.

हिंदुस्थान

# मराठी विभाग : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग हा संपूर्ण महाराष्ट्रातील एक क्रियाशील शैक्षणिक विभाग आहे. मागील तीस वर्षांपासून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी व नावीन्यपूर्ण उपक्रमांनी या विभागाने शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रात आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाची वाटचाल अतिशय व्रतस्थपणे सुरू आहे. मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता, स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासक, समीक्षक, विभागप्रमुख प्रा.डॉ.मोना चिमोटे यांच्या नेतृत्वात विभाग आपली वेगळी ओळख निर्माण करीत आहे.

मराठी विभाग हा आचार्य पदवीसाठीचे अधिकृत संशोधन केंद्र म्हणून कार्यरत आहे. आचार्य पदवी कोर्स वर्क येथे यशस्वीपणे पार पाडल्या जातो. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या जेआरएफ तसेच राज्य शासनाच्या विविध संस्थांद्वारे देण्यात येत असलेल्या अधिछात्रवृत्ती अंतर्गत संशोधन करणाऱ्यांसाठी संशोधनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून या विभागाची ओळख आहे. उच्च शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या सर्व आधुनिक सोई सुविधा या विभागात उपलब्ध आहेत. तसेच या विभागातील शिक्षकांनी आपल्या वैयक्तिक योगदानातून विद्यार्थ्यांसाठी अद्यावत संदर्भग्रंथांनी समृद्ध असलेले दालन विभागात तयार केले आहे. विभागाची पूर्वपरंपरा कायम राखत नव्या व्यावसायिक गरजा ओळखून विविध रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात करणाऱ्या उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. विद्यापीठात कमवा आणि शिका योजनेमुळे विद्यार्थ्यांना रोज चार तास काम करून स्वावलंबी होण्याची संधी मिळते. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना वसतिगृहात अल्पदरात राहण्याची संधी उपलब्ध असते. विभागात नुसताच अभ्यास नसतो तर स्वागत समारंभ आणि निरोप समारंभ, विशेष व्याख्याने, 'लेखक आपल्या भेटीला', सारखे उपक्रम, गटचर्चा, ग्रंथचर्चा आणि सर्वात जास्त लक्षात राहणाऱ्या शैक्षणिक सहली या सर्व गोष्टी विद्यार्थी-प्राध्यापक मिळून आयोजित करतात.

नवीन शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये अपेक्षित असलेल्या कौशल्याधारित बदलांसह मागील दोन शैक्षणिक वर्षांपासून नव्या अभ्यासक्रमासह एम.ए. मराठी भाग १ चे नियमित प्रवेश विभागात सुरू झाले आहेत.

विद्यार्थ्यांना जीवन व्यवहारांच्या विविध क्षेत्रांतील आंतरसंबंधाचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी व वैश्विक मानवतेच्या व्यापक पटावर जीवनाचे आकलन करून देणारी दृष्टी त्यांना प्राप्त व्हावी, यासाठी विभागातील अध्यापक सातत्याने प्रयत्नशील असतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत नव्याने सुरू झालेल्या अभ्यासक्रमात जीवनोपयोगी कौशल्यांवर भर देणाऱ्या, व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक असलेल्या तसेच विविध स्पर्धापरीक्षांना उपयोगी ठरणाऱ्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. विभागाच्या वतीने सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणाऱ्या सेट,नेट परीक्षांसाह केंद्रीय लोकसेवा आयोग तसेच राज्य लोकसेवा आयोग इत्यादी परीक्षांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असणाऱ्या 'मराठी साहित्य' या वैकल्पिक विषयाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे या हेतूने विभागाच्या वतीने विविध कार्यशाळांचे व अनौपचारिक मार्गदर्शन वर्गांचे आयोजन करण्यात येत असते.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, विदर्भ साहित्य संघ, साहित्य अकादमी यांसारख्या शैक्षणिक संस्था यांच्या सहकार्याने विविध दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन विभागाच्या माध्यमातून करण्यात येत असते. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत विभागाच्या वतीने दरवर्षी विविध परिसंवाद, नामवंत वक्त्यांची व्याख्याने, स्पर्धा, कार्यशाळांचे आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन असे नावीन्यपूर्ण आयोजित केले जातात.

विभागात एम. ए. मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असणाऱ्या सर्व पत्रिकांचे अध्यापन येथे केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यायांपैकी आपल्या आवडीचा पर्याय निवडण्याची संधी मिळते. विभागाच्या स्थापनेपासूनच विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळविण्याची परंपरा विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी कायम ठेवली आहे. विभागाचे अनेक माजी विद्यार्थी विविध महाविद्यालये आणि कार्यालयांमध्ये उच्चपदस्थ स्थानांवर कार्यरत आहेत . पत्रकारिता, आकाशवाणी, दूरदर्शन , शासकीय कार्यालये आणि शाळा - अशाही ठिकाणी या विभागाचे विद्यार्थी यशस्वीपणे वावरत आहेत.

नवीन शैक्षणिक धोरणातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती, जिज्ञासूपणा आणि ज्ञानलालसा वाढीस लागण्याच्या हेतूने व प्राप्त ज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन करण्याचे कौशल्य आत्मसात होण्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक आणि तुलनात्मक अभ्यास दृष्टीचा विकास होण्यास मदत होणार आहे. तसेच जीवनातील सैद्धान्तिक आणि प्रायोगिक पातळीवरील समस्यांचे कालसापेक्ष भान निर्माण होऊन सर्जनशील पर्याय देण्याची प्रक्रिया त्यांच्यामध्ये विकसित होईल. माहिती व तंत्रज्ञानाची कौशल्ये विकसित करून रोजगाराच्या नवनवीन संधी त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

**रोजगाराच्या संधी:**

मराठी विषयात एम. ए. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या विविध संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होतील. त्यातील काही महत्त्वाच्या संधी पुढीलप्रमाणे आहेत. पदव्युत्तर मराठीचा विद्यार्थी हा शिक्षक या पदांच्या नोकरीसाठी पात्र ठरेल, सहायक प्राध्यापक होण्याची पूर्वअट तो पूर्ण करू शकेल, राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करण्यासाठी सदर अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल, विविध सरकारी कार्यालये, एल.आय.सी., बँक, सरकारी सेवा आदी कार्यक्षेत्रांत रोजगार उपलब्ध होतील, पत्रकारिता, दूरचित्रवाणी, आकाशवाणी आदी क्षेत्रांत लेखन आणि निवेदन असे क्षेत्र निवडता येईल, भाषांतर / अनुवाद क्षेत्रात मोठी संधी मिळेल, भाषाविज्ञान, ग्रंथालयशास्त्र, सर्जनशील लेखन, नाट्यक्षेत्र इत्यादी क्षेत्रांमध्ये काम करता येईल, मुद्रित शोधन, संपादकीय व प्रकाशन व्यवसाय आदी क्षेत्रांत रोजगार मिळू शकेल, प्रवक्ता, निवेदक, भाष्यकार, सूत्रसंचालक, व्याख्याता म्हणून ओळख निर्माण करता येईल, दाखले, उदाहरणे, कोट्या, विनोद, म्हणी, वाक्प्रचार, कविता, गझल यांचा प्रभावीपणे वापर करून उत्तम वक्ता होता येईल, भाषिक कौशल्ये व सर्जनशीलतेचा विकास होऊन लेखक म्हणून प्रस्थापित होता येईल.

तसेच विद्यार्थ्याला संशोधक, विश्लेषक, तुलनाकार, टीकाकार, भाष्यकार म्हणून कार्य करता येईल. कंटेंट रायटर, संपादक, वृत्त निवेदक, सोशल मिडिया मॅनेजर इत्यादी क्षेत्रांत देखील तो रोजगार मिळवू शकेल. विद्यार्थ्याला ऑनलाईन ट्यूटर प्रशिक्षक, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शक, युट्यूबवरून व्याकरणाच्या अध्यापनाचे व्हिडिओ प्रसारित करून रोजगार मिळवता येईल, चित्रपट व मालिका पटकथालेखन, माहितीपत्राचे लेखन, ब्लॉग रायटर, गीतकार म्हणून लौकिक व रोजगार प्राप्त करता येईल, माहितीपर लेखन, अहवाल लेखन, वृत्तांत व इतिवृत्त लेखन, माहिती पुस्तिका, माहिती पत्रक, स्मरणिका, गौरविका, मानपत्र, पत्र, पत्रिका आदींचे लेखन करता येईल, विविध समाजमाध्यमातील जाहिरात लेखनाची कौशल्ये विकसित होतील, संकेतस्थळांना हाताळण्याची व माहितीच्या विश्वासार्हतेची शहानिशा करता येईल.

अशा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या पदव्युत्तर मराठी विभागाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ एम.ए. प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्रासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अनुषंगाने मागील शैक्षणिक सत्रापासून नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना हॉर्ति:// ेसलर्रीरवा.ेरार्रोह.शर्वा.ळप/ळपवश.हिं या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज भरता येईल. प्रवेश अर्ज भरून त्याची एक प्रत पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्याकडे विहित मुदतीच्या आत सादर करावी लागणार आहे. प्रवेश प्रक्रियेविषयीचे वेळापत्रक संकेतस्थळावर दिलेले आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे (९४२२१५५०८८) यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ.. माधव पुटवाड(९४२३३७५०६०२) , डॉ. प्रणव कोलते ( ९८५०४८८२२२) यांच्याशी विभागात प्रत्यक्ष संपर्क साधता येईल.

● अभिजित इंगळे
मो. ८४२१९५८२७९

प्रतिदिन अखबार

# श्री चक्रधरस्वामी एक भारतीय अवतार हैं

## श्री चक्रधरस्वामी, लीलाचरित्र' पर आयोजित व्याख्यान में प्रो. डहाके का प्रतिपादन





प्रतिनिधि/ प्रतिदिन अखबार

अमरावती, 28 अगस्त- प्रसिद्ध लेखक और अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन के पूर्व अध्यक्ष वसंत डहाके ने कहा कि श्री चक्रधरस्वामी, जो समाज में जाकर लोगों से संवाद करते हैं और जागरूकता पैदा करते हैं, एक भारतीय अवतार हैं, वे संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के महानुभाव अध्ययन केंद्र की ओर से श्री चक्रधरस्वामी अवतार दिवस के अवसर पर आयोजित 'श्री चक्रधरस्वामी और लीलाचरित्र' विषय पर व्याख्यान देते हुए बोल रहे थे. चर्चा की अध्यक्षता प्रो-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने की, जिसमें प्रसिद्ध कवयित्री और आलोचक डॉ. प्रभाताई गणोरकर मुख्य अतिथि के रूप में, श्री शिवाजी शिक्षण संस्थान के पूर्व सचिव डॉ. अशोक राउत और अध्ययन केंद्र के प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर शामिल हुए. डहाके ने कहा कि गुजरात से आने के बाद, श्री चक्रधरस्वामी ने गोविंद प्रभु से मुलाकात की और वहां उनका अनुग्रह प्राप्त किया. लीलाचरित्र की पृष्ठभूमि की व्याख्या करते हुए, प्रो. डहाके ने लीलाचरित्र कैसे लिखा गया, चक्रधरस्वामी की महाराष्ट्र भर में यात्राएं, लोगों के साथ बातचीत, उत्तरपंथी गमन यानी लोगों से दूर जाना आदि पर प्रकाश डाला. उन्होंने कहा कि लीलाचरित्र लिखते समय, उन्होंने पहले उत्तरार्ध, फिर पूर्वार्ध और अंत में पहला भाग लिखा. इस अवसर पर उन्होंने यह भी आह्वान किया कि महानुभाव मराठी भाषा की महिमा है और इसका अध्ययन किया जाना चाहिए.मुख्य अतिथि डॉ. प्रभा गणोरकर ने कहा कि महानुभाव दर्शन अद्वितीय है और गोविंद प्रभु एक अद्वितीय व्यक्तित्व थे. डॉ. गणोरकर ने लीलाचरित्र में कई घटनाओं का वर्णन करते हुए कई दृष्टांतों का भी विस्तार से वर्णन किया. उन्होंने उपस्थित लोगों को यह भी बताया कि कैसे श्री चक्रधरस्वामी को गोविंदप्रभु से स्थिरता मिली.

### हम उनके विचारों को सुना पा रहे हैं- ढोरे

अपने अध्यक्षीय भाषण में, प्रो-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने कहा कि यह हमारा सौभाग्य है कि हम उन लोगों के विचारों को देख और सुन पा रहे हैं जिनके बारे में हमने केवल सुना था. प्रो. डहाके ने भी विषय को संक्षिप्त रूप से प्रस्तुत किया. प्रो-कुलपति ने यह भी कहा कि उस समय की स्थिति और दृष्टांतों को सुनकर उन्हें संतुष्टि हुई.कार्यक्रम का आरंभ श्री चक्रधरस्वामी की छवि की पूजा, पुष्पांजलि और दीप प्रज्वलन के साथ हुआ. प्रस्तावना में, अध्यापन केंद्र के प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर ने कार्यक्रम का उद्देश्य समझाया. कार्यक्रम का संचालन डॉ. संदीप जुनघरे ने किया, जबकि प्रो. संदीप तड़स ने धन्यवाद ज्ञापन किया. कार्यक्रम में विश्वविद्यालय कार्यकारिणी समिति के सदस्य डॉ. भैयासाहेब मेटकर भी उपस्थित थे. महानुभाव संप्रदाय के महिला-पुरुष और अमरावती शहर तथा शहर के बाहर से आए गणमान्य लोग भी उपस्थित थे.

मराठी दैनिक
वृत्त केसरी

## विद्यापीठात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

# शैक्षणिक विकासामध्ये सर्वांचे योगदान महत्वाचे

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे प्रतिपादन





प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, १६ ऑगस्ट: शैक्षणिक विकासामध्ये सर्वांचे योगदान महत्वाचे असल्याचे मत कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 79 वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ध्वजारोहण केले.

ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, 15 ऑगस्ट, 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. हा दिवस आपल्याला आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाची आठवण करुन देतो. स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय मुक्ती नाही, तर सामाजिक आणि आर्थिक समानता देखील आहे. 78 वर्षात आपल्या देशाने अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केली असून विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी आणि शिक्षणामध्ये आपण मैलाचे दगड गाठले आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे आणि असमानता हे सुद्धा एक आव्हान आहे. नवीन शैक्षणिक धोरण लागू झालेले आहे. या धोरणाची परिपूर्ण अंमलबजावणी करण्याचे इंद्रधनुष्य आपण हाती घेतले आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांची पदभरती सुद्धा लवकरच केली जाणार असल्याची घोषणा मंत्री महोदयांनी यापूर्वी केली आहे. स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलीदान देणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करुन कुलगुरूंनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले.

दिव्य मराठी . अमरावती. गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ । २

**मंत्र** • उद्योजकता प्रशिक्षण शिबिरात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

# नोकरी मागण्यापेक्षा इतरांना रोजगार देण्याचा मंत्र शिका

प्रतिनिधी | अमरावती





अमरावती विद्यापीठाची कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, तर दुसरीकडे उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थीनी.

आजघडीला आपल्या देशात मोठ्या उद्योगांच्या संधी उपलब्ध आहेत. शासनानेही अनेक योजना सुरू केल्या आहेत. ज्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्य घडविता येईल. तसेच नवनवी संकल्पना अंमलात आणा, जगाने जो नोकरी मागण्यापेक्षा देण्याचा मंत्र स्वीकारला आहे, तो मंत्र शिका व मोठे उद्योजक बना, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून प्रियदर्शनी ग्रुप ऑफ इन्स्टिटयुशन्स नागपूरचे संचालक डॉ. विवेक नानोटी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.

या वेळी कुलगुरू म्हणाले, इन्क्युबेशन सेंटरच्या वतीने चांगले उपक्रम राबवले जात आहेत. भविष्यात यापेक्षाही अधिक चांगल्या प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांकरिता राबवले जातील. सेंटरमार्फत आयोजित स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. आज विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. नवनवीन कल्पना हेरुन विद्यार्थ्यांनी उद्योग व्यवसायाकरिता प्रयत्न करावेत, असे सांगून उद्योजक व्हा, असा सल्लाही कुलगुरू यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

तत्पूर्वी, संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी प्रशिक्षण शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. संचालन व आभार विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी मानले. प्रशिक्षण शिबिराला विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजकता विकास हे सामाजिक बदलाचे स्वरुप

नावीन्यपूर्णता आत्मसात करावी. अमेकिरेसारखे देश याच नावीन्यपूर्णतेमुळे आज बलाढ्य झालेले आहेत. शिक्षकांनीही वर्गात शिकवताना विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्नांचा भडीमार सुरू होईल, असे शिकवावे. ते म्हणाले, उद्योजकता विकास हे सामाजिक बदलाचे स्वरुप आहे. येणारे दशक हे विकासाचे दशक असेल. त्यामुळे नावीन्यपूर्णता आत्मसात करावी.

### मानसिकता बदला : डॉ. नानोटी यांचे आवाहन

आपण जगातील देशांकडे पाहून तेथील विकासाबद्दल बोलत असतो. परंतु, आपणही जगाकडे पाहून पुढे जाण्यासाठी धडपडत राहिले पाहिजे. नावीन्यपूर्णता ही जगाने आत्मसात केली आहे. आपण बलाढ्य देशांच्या विकासाकडे पाहून बोलत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मानसिकता बदलणे गरजेचे आहे, असे डॉ. नानोटी यांनी सांगितले.

## मंगल प्रहर

# संगठन और विश्वविद्यालय के शैक्षिक हितकारी संयुक्त प्रयास से सक्षम पीढ़ी होगी तैयार

**डॉ. मिलिंद बारहाते का प्रतिपादन** | **शैक्षिक महासंघ की पहल से कार्यशाला संपन्न**





अमरावती। मंगल प्रहर ब्युरो

संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के आईक्यूएसी (आंतरिक गुणवत्ता आश्वासन कक्ष) और अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ अमरावती विश्वविद्यालय के संयुक्त तत्वावधान में आयोजित शैक्षणिक नीति 2020ः उपलब्धियां, चुनौतियां और भविष्य दृष्टिकोण विषयक कार्यशाला शिक्षा क्षेत्र के महत्वपूर्ण घटकों की उपस्थिति में विश्वविद्यालय के ए.बी. थिएटर में भव्य रूप से संपन्न हुई। कार्यशाला का उद्घाटन शैक्षिक महासंघ की अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ. मीनल भोंडे की अध्यक्षता में संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के कुलपति डॉ. मिलिंद बारहाते के शुभ हस्तों द्वारा किया गया। मुख्य अतिथि तथा बीज वक्ता के रूप में डॉ. अविनाश आवलगांवकर, कुलपति, मराठी भाषा विश्वविद्यालय, रिद्धपुर विभाग के उच्च शिक्षा सह-संचालक डॉ. केशव तुपे, शैक्षिक महासंघ के विभागीय महामंत्री डॉ. मंगेश अडगोकर और विश्वविद्यालय के आईक्यूएसी निदेशक डॉ. संदीप वाघुळे मंचासीन थे।

उद्घाटन सत्र में संबोधित करते हुए कुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने राष्ट्रीय शैक्षणिक नीति की व्यापक समीक्षा करते हुए संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के विशेष कार्यों को रेखांकित किया। उन्होंने कहा कि इस नीति के कारण कई उपलब्धियां हासिल हुई हैं। शिक्षा क्षेत्र में कई चुनौतियां हैं, किंतु विश्वविद्यालय उनसे पार पाने का प्रयास कर रहा है। भविष्य को और दृष्टि रखते हुए वर्तमान कठिनाइयों पर विचार किया जाएगा। इससे विकसित भारत 2047 के लक्ष्य की प्राप्ति में सभी का योगदान होगा। अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ द्वारा संस्थान संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, छात्र और अभिभावकों के दृष्टिकोण को ध्यान में रखते हुए किए गए इस सराहनीय प्रयास के लिए उन्होंने महासंघ की पूरी टीम को बधाई दी। बीज भाषण में डॉ. अविनाश आवलगांवकर ने कहा कि ब्रिटिशकालीन शिक्षा पद्धति मूलतः कामकाजी मानव संसाधन तैयार करने के उद्देश्य से बनाई गई थी, जबकि प्राचीन भारत का शिक्षा लक्ष्य ज्ञानार्जन के माध्यम से व्यक्तित्व निर्माण था। राष्ट्रीय शैक्षणिक नीति के माध्यम से सामाजिक परिवर्तन हेतु शिक्षा दृष्टिकोण में बदलाव का महत्त्वपूर्ण कार्य किया गया है। इसने छात्रों के अंतर्विषयक अध्ययन के लिए अनुकुल वातावरण बनाया और आत्मविश्वास को सुदृढ़ करने का प्रयास किया। उन्होंने कहा कि उपलब्धियों और चुनौतियों के बीच, ज्ञानदान का व्रत लेने वाले सशक्त हाथों को चुनौतियों को अवसर में बदलना चाहिए। उन्होंने आदर्श पीढ़ी निर्माण में शिक्षकों की जिम्मेदारी पर जोर देते हुए सामाजिक समस्याओं के समाधान हेतु शिक्षा क्षेत्र में विशेष शोध की आवश्यकता बताई। अध्यक्षीय उद्बोधन में डॉ. मीनल भोंडे ने कहा कि आने वाली पीढ़ियों को जागरूक, सक्षम और जिम्मेदार वैश्विक युवा बनाने के लिए राष्ट्रीय शैक्षणिक नीति को जड़ें जमाने और फलने-फूलने देना होगा। इस नीति को और अधिक फलदायी बनाने हेतु शैक्षिक महासंघ देशभर में चिंतन-मंथन कार्यशालाएं आयोजित कर रहा है। उन्होंने कहा कि महासंघ किसी श्रमिक फेडरेशन की तरह केवल अधिकारों के लिए संघर्ष करने वाला संगठन नहीं है, बल्कि वैचारिक और दार्शनिक आधार को बनाए रखने वाला तथा कर्तव्यों की चेतना रखने वाले बुद्धिजीवियों का संगठन है। उन्होंने संगठन की राष्ट्र के हित में शिक्षा, शिक्षा के हित में शिक्षक, शिक्षक के हित में समाज इस त्रिसूत्री की याद दिलाई।

द्वितीय सत्र में प्रमुख मार्गदर्शक के रूप में डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्रो-कुलपति, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विश्वविद्यालय तथा महाराष्ट्र राज्य की सुकाणू समिति के सदस्य ने एनईपी 2020 की छह वर्टिकल्स से छात्र और शिक्षक के लिए मौजूद अवसरों का सहज विश्लेषण किया। उन्होंने कहा कि यह नीति अंतर्विषयक शिक्षा और कौशल विकास की क्षमता बढ़ाने में बड़ी उपलब्धि है। उन्होंने सांस्कृतिक विरासत, व्यावहारिक ज्ञान परंपरा और मूल्य-आधारित छात्रों का निर्माण करने तथा छात्र-केंद्रित शिक्षा और पाठ्यक्रम तैयार करने का आह्वान किया। इस सत्र के अध्यक्षीय संबोधन में अमरावती विश्वविद्यालय के प्रो-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने सफल आयोजन के लिए शैक्षिक महासंघ को बधाई दी और कहा कि इस कार्यशाला में उपलब्धियां, चुनौतियां और भविष्य दृष्टिकोण का व्यापक विचार किया गया, जो संतोषजनक है।

कार्यक्रम की शुरुआत संत गाडगे बाबा और माता सरस्वती की प्रतिमा पूजन, पुष्पार्पण, विश्वविद्यालय गीत और डॉ. पूर्णिमा दिवसे के मधुर स्वर में सरस्वती वंदना से हुई। प्रस्तावना में डॉ. मंगेश अडगोकर ने कार्यशाला के उद्देश्य पर प्रकाश डाला। प्रथम सत्र का संचालन डॉ. प्रमोद गारोडे और आभार डॉ. ओमप्रकाश मुंदे ने व्यक्त किया। द्वितीय सत्र का संचालन डॉ. शिवाजी नागरे ने और आभार डॉ. मंगेश अडगोकर ने व्यक्त किया। समापन प्रा. सोनाली आसरकर के शांति मंत्र से हुआ। विश्वविद्यालय के पांचों जिलों से प्राचार्य, प्राध्यापक, आईक्यूएसी समन्वयक, एनईपी सेल के सदस्य और छात्र बड़ी संख्या में उपस्थित थे।

## पुण्य नगरी



# विद्यापीठात डॉ. रंगनाथन जयंतीनिमित्त अभिमुखता सोहळा

**ज्ञानस्त्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे आयोजन**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती :** विद्यापीठात डॉ. एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्ताने ज्ञानस्त्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने अभिमुखता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे उपस्थित होत्या.

यावेळी डॉ. मनिषा कोडापे यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयाव्दारे उपलब्ध आधुनिक सुविधा, विद्यार्थी ते संशोधक असा प्रवास करीत असतांना सुविधांचा उपयोग याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. विविध माहिती स्त्रोतांचे सादरीकरण, ज्ञानस्त्रोत केंद्रातील नियतकालिके, ऑनलाइन डाटाबेसेस, रिमोट ॲक्सेस सुविधा, चॅट जीपीटीचा वापर करून स्कोपस आणि वेब ऑफ सायन्स या डाटा बेसेसमध्ये माहिती कशी शोधायची याचेही सादरीकरण केले. प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विशाल बापते यांनी केले. सूत्रसंचालन तृशाल गुल्हाने तर आभार अश्विनी मुळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्योती गेडाम, तृशाल गुल्हाने, शितल नासणे, सोनल उताणे, अजय पाचगडे, स्वाती शिंदे, स्नेहल मुळे, माणिक बोरकर यांनी परिश्रम घेतले.

दैनिक भास्कर

# दोस्ताना माहौल में हो पढ़ाई : ढोरे

## विद्यापीठ में मनाया गया रैगिंग विरोधी सप्ताह





भास्कर डेस्क | अमरावती.

पढ़ाई के दौरान हमारा एक भविष्य, एक सपना होता है और हम उसे पूरा करने के लिए पढ़ाई करते हैं, लेकिन पढ़ाई के दौरान छात्रों को अपने आसपास एक दोस्ताना माहौल बनाना चाहिए, इस आशय का आग्रह संत गाड़गेबाबा अमरावती विद्यापीठ के प्र-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने किया।

विश्वविद्यालय अनुदान आयोग के निर्देशानुसार 12 अगस्त को राष्ट्रीय रैगिंग विरोधी दिवस और सप्ताह का उद्घाटन प्रतिकुलपति डॉ. महेंद्र ढोरे ने किया। अध्यक्षीय विचार व्यक्त करते हुए बोल रहे थे। मंच पर रैगिंग विरोधी दस्ते के अध्यक्ष डॉ. प्रणव कोलते, नोडल अधिकारी डॉ. प्रशांत ठाकरे, दस्ते की सदस्य डॉ. कल्पना जावले उपस्थित थीं। एंटी-रैगिंग स्क्वॉड के नोडल अधिकारी डॉ. प्रशांत ठाकरे ने एंटी-रैगिंग सप्ताह के पीछे की भूमिका प्रस्तुत करते हुए छात्रों को महाराष्ट्र में कुछ स्थानों पर हुई रैगिंग के प्रकारों और उसके बाद की गई कार्रवाई के बारे में जानकारी दी। प्रस्तावना में डॉ. प्रणव कोलते ने एंटी-रैगिंग दिवस और सप्ताह के आयोजन का महत्व समझाया। डॉ. अभिजीत इंगले ने कार्यक्रम का संचालन किया, जबकि एंटी-रैगिंग स्क्वॉड की सदस्य डॉ.कल्पना जावले ने धन्यवाद ज्ञापन किया। बड़ी संख्या में विश्वविद्यालय के प्रोफेसर, शिक्षक, छात्र और पूर्व छात्र उपस्थित थे।


# लैंगिक समानता व महिला सक्षमीकरणासाठी न्यायप्रणालीची उपयुक्तता

## विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेतील चर्चेचा सूर

प्रतिनिधी /२८ ऑगस्ट

अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा पीएम-उषा अंतर्गत 'जेंडर इक्विटी अँड वुमेन एम्पॉवरमेंट' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राला अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तर उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे उपस्थित होत्या. त्यांसह वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे आणि सह समन्वयक डॉ. वैशाली धनविजय उपस्थित होत्या.





या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात छत्तीसगड राज्यातील रायपूर येथील हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतील डॉ. पंकज उंबरकर यांनी 'जेंडर इक्विटी अँड दि जुडीशियल सिस्टम' याविषयावर मांडणी केली. न्यायव्यवस्थेत लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बदलांवर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच महिलांच्या न्यायप्रवेशातील समस्या आणि त्यावरील उपाय यावर सविस्तर विवेचन केले. त्यांनी ऐतिहासिक खटले, न्यायालयीन निर्णय आणि वर्तमानातील प्रकरणांचा संदर्भ देत लैंगिक समानतेसाठी न्यायव्यवस्थेच्या भूमिकेची महत्त्वपूर्णता स्पष्ट केली. न्यायदान केवळ कायदेशीर प्रक्रियापुरते मर्यादित न राहता ते सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून असले पाहिजे, असे प्रतिपादन केले. यांसदर्भात भारतीय संविधानाचे महत्त्व व वैशिष्ट्ये त्यांनी अधोरेखित केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात छत्तीसगड राज्यातील रायपूर येथील हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीमधीलच डॉ. प्रियंका मोहोड यांनी 'वुमेन एम्पॉवरमेंट अँड लॉ' या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी महिला सक्षमीकरणाची संकल्पना स्पष्ट करून कायद्याद्वारे महिलांचे सक्षमीकरण करण्यासंदर्भात आपल्या मांडणीद्वारे चर्चा केली. स्त्रियांसाठी अस्तित्वात असणारे कायदे, त्यांमागील पार्श्वभूमी स्पष्ट करून त्यांनी आवश्यक बदलांविषयी चर्चा केली. पहिल्या व दुसऱ्या सत्रांमध्ये विषयतज्ज्ञांनी सहभागींसोबत संवादात्मक चर्चा केली. तसेच विविध कृतींच्याद्वारे विषय विवेचन केले. काही महत्त्वाचे माहिती पट दाखवून त्यावर चर्चा केली. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात अमरावतीतील भारतीय महाविद्यालय येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. दया पांडे यांनी विषयतज्ज्ञ म्हणून सहभागींशी चर्चा केली. या सत्रात जेंडर इक्विटी अँड वुमेन एम्पॉवरमेंट संदर्भात सहभागींनी काही प्रश्न विचारले, काही आपले मते मांडली. हे सत्र संवादात्मक होते. ज्यामध्ये स्त्रियांविरुद्ध हिंसाचार, समानता, स्त्रियांचे माध्यमांमधील सादरीकरण, संस्कृती आणि स्त्रिया अशा अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा घडून आली. तर कार्यशाळेच्या समारोप सत्राला अध्यक्ष म्हणून वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रीय कार्यशाळेत दिवसभर झालेल्या मांडणीचा आढावा घेतला.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

**मार्गदर्शक**



**श्री सी. पी. राधाकृष्णन**
**मा. राज्यपाल तथा कुलपती**
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**
**मा. कुलगुरू**
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**
**मा. प्र-कुलगुरू**
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ

**प्रकाशक**



**डॉ. अविनाश असनारे**
**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ

**संपादक**



**डॉ. विलास नांदुरकर**
**जनसंपर्क अधिकारी**
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ